श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] [ अंक १-२.

नळिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।
—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... | १—१६ |
| पिशाचयोनी ( अपूर्ण ) ... ... | १–८ |
| श्री शिरडी संस्थानचा ६, ७ व ८ वा म्हणजे शके १८४९-५०-५१ सालचा त्रैवार्षिक तौळनिक अहवाल | १-१२ |
| अनुभव ... ... ... ... | १–२ |
| केकावलि ... ... ... ... | |


---

# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" ही टीका श्री साई लीलेच्या ४–५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आजमितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

---

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साई लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक

# अनुभव.

## (१)

" अहो बाबासाहेब! तुम्ही येथें कां आलांत? येथें काय आहे? [illegible]ुमच्यासारखी मंडळी येथें येतात त्यामुळें लोकांची दिशाभूल होत आहे." [illegible]ाप्रमाणें शाब्दिक भडिमार माझ्या स्नेह्यावर गुलाबी झगा घातलेल्या एका सद्गृहस्थानें केला.

[illegible] वेळ इ. स. १९१० च्या डिसेंबर महिन्याची ६ वी तारीख. त्यांची [illegible]ी शिरडीस जाण्याची दुसरी खेप. मनाला सारखी तळमळ लागून, शिर[illegible]ीस जाण्याची अत्यंत तीव्र उत्कंठा प्रदीप्त होऊन, चार दिवसांची रजा [illegible]ऊन वर निदर्शविलेल्या तारखेला तो शिरडीस गेला होता. शिरडीस [illegible]ण्याचें त्याचें मुख्य प्रयोजन हें होतें कीं, संसाराच्या व नोकरीच्या दगदगींतून थोडे दिवस मुक्त होऊन संतांच्या पायापाशीं बसल्यानें मनाला शांति व समाधान मिळावें.

त्या वेळीं तो एकटाच गेला होता. रिवाजाप्रमाणें कोपरगांवीं गं[illegible] स्नान करून पुढें शिरडीस गेला तरी सकाळचे साडे नऊचा सुमार झाला होता.

उतरावयासाठीं एक श्री[illegible]ठ्यांचाच वाडा त्या वेळीं होता. श्री. दीक्षितांचा वाडा त्यानंतर पुष्कळ वेळानें बांधविण्यांत आला. वाड्याच्या पुढल्या दरवाज्यांत प्रवेश करून समोरच्या दालनांत मंडळी उतरत असे. डाव्या बाजूच्या दालनांत कै. बाळाभाऊ चांदोरकरांची खाणावळ होती. उजव्या दालनांत कांहीं कुटुंबवत्सल मंडळीला उतरण्याची सोय असे. त्याच्या ओट्यावर एके बाजूला कै. मेघा याची वस्ती व त्याची पूजेची व्यवस्था [illegible]तीं. पुढची माडी कै. साठे यांच्या ताब्यांत होती आणि वरच्या मागल्या [illegible]डींत कै. नूलकरांची मंडळी होती. श्री. नूलकर बहुधा खालींच इतर [illegible]डळीमध्यें बसत असत.

माझा मित्र आपला बिस्तरा व कपडयाची पेटी ठेवतो न ठेव इतक्यांत त्याला एका बाजूनें वर वर्णन केलेल्या गुलाबी झगा पेहरलेल्य गृहस्थानें पकडून, वर वर्णन केल्याप्रमाणें त्याच्यावर शब्दांचा सारख भडिमार केला. दुसऱ्या बाजूला हातांत एक लहानशी छडी, तिच्या एक टोंकाला थोडीं फुलें बांधलेली आहेत, अशा पांढरा झगा पेहरलेल्या एक गृहस्थानें पकडून त्याला विचारलें " अहो ! स्थितप्रज्ञ म्हणजे काय ? "

एका बाजूनें " येथें कां आलांत ? " आणि दुसऱ्या बाजू " स्थित प्रज्ञ म्हणजे काय ? " अशी सारखी घोषणा चालविल्यामु रात्रीचें जागरण आणि अकरा मैल टांग्यांतल्या प्रवासाच्या दगदगीनें झाले त्रास, आणि त्यांत संवयीमुळें चहाच्या प्याल्यासाठीं हपापलेलें शरीर, य सर्व कारणांनीं फक्त पांच मिनिटांच्या आंतच त्याचा जीव गोंधळून जाऊ न आपण इकडे कशाला आलों असें त्याला वाटूं लागलें.

मनाला शांति वाटावी, संतांच्या पायांपाशीं बसून संसाराचा विसर पडावा ही उत्कट इच्छा असतां येथें हा असा त्रास व्हावा याळें त्याच्य हो ताची पूर्ण चलबिचल होऊन, आपण इकडे उगाच आलों, तेंं मुंबईंत क होतें असेंही त्याला वाटूं लागलें.

मित

तशांत हे दोन्ही गृहस्थ त्याच्या अतिपरिचयांतले होते असेंही नव्हतें. तरी आपणाला कंटाळा आला आहे याचें चर्येवर यत्किंचित् दिग्-दर्शन न करितां, श्री. बाळाभाऊनीं आणलेल्या चहाचा परामर्श घेऊन तो श्री. सांईबाबांच्या दर्शनाला गेला. बरोबर माधवराव देशपांडे होते.

रिवाजाप्रमाणें श्रींच्यापुढें उदबत्ती व कापूर लावून, श्रीफळ ठेवून नमस्कार घातला. श्री सांईबाबांनीं आपला वरदहस्त त्याच्या माथ्यावर ठेवला. श्री फळाचा प्रसाद दिला आणि बसावयाची आज्ञा केली. त्याप्र-माणें तो श्रींच्या दरबारांत बसला. मनांत दृढ हेतु हा कीं, श्री सांईबाब पाशीं परत जाण्याची आज्ञा मागावी.

श्री साईमाऊली, साक्षात् प्रेमाची मूर्तिमंत सोज्वळ मूर्तीच ती, स्नेह्याच्या अंतःकरणाची तळमळ जाणून, माधवरावांना म्हणाली " शामा ! हा असें काय करतो रे ! याला दोन गोष्टी सांग ! जा आतां ! उदी घेऊन वाड्यांत जाऊन बसा ! "

त्याप्रमाणें उदी घेऊन माधवरावजी व तो मशिदीच्या आवारांतून निघून बाहेर सडकेवर आले, तेथें त्याला माधवरावजींनीं उभें करून त्याच्याजवळ खुलासा मागितला. त्यानें घडलेली हकीकत सांगितली. तेव्हां माधवरावजी म्हणाले, " अहो ! हीच तर या देवाची करामत व शिकवणूक दिसते कीं, संसारांतल्या अशा प्रकारच्या गोंधळांत राहून देवाकडे मन कसें सतत निश्चल ठेवावें तें ! तुम्ही तेथें जरी संसारांतल्या व नोकरीच्या दगदगींत असलांत तरी त्यांतल्या त्यांत देवाकडे मन सारखें ठेवीत असावें. चला, आतां आपण बाबांकडे परत जाऊं आणि ते काय सांगतात तें ऐकूं ! "

ते दोघे उलट पाऊलीं श्रीकडे गेले. मशिदीच्या पायऱ्या चढून जातां क्षणींच बाबा त्याला म्हणाले, " भाऊ ! शामा म्हणाला ते बोल लक्षांत ठेवा बरें ! "

हा सर्व खेळ पाहून मित्राला अत्यंत गहिंवर आला. त्यानें श्रींच्या पायांवर प्रेमाश्रूंनीं अभिषेक केला, आणि नंतर अति उत्साहानें व समाधानानें चार दिवस तो शिरडीस राहिला.

या शिकवणीनें त्याला या जन्मांत अत्यंत अवर्णनीय असा फायदा झाला आहे. प्रत्येक संसारी गृहस्थाप्रमाणें त्याच्यावर अनेक बिकट संकटें आलीं, परंतु त्या सर्वांतून अत्यंत निर्भयतेनें श्रीसाईबाबांवर पूर्ण भरंवस ठेवून तो मजल कापीत आहे.

असो, चार दिवस तेथें असतांना श्रींच्या अनेक लीला त्याला पाहावयास मिळाल्या. ज्या पुढें मागें श्रीलीलेंत येतीलच. सध्यां त्यांपैकीं एक

ठळक गोष्ट त्याच्या दृष्टिपंथांत आली ती अशीः—( या गोष्टीविषयीं कै. दाभोळकरांनीं श्रीसाई सच्चरितांत एक उत्कृष्ट अध्याय रचिला आहे. )

ज्यांनीं " गुलाबी झगा पेहरला होता म्हणून वर वर्णन केलें आहे ते त्या वेळीं एक गुलाबी रंगाचा कफनीसारखा झगा लेवित असत त्यावरून त्या वेळीं हयात असलेल्या कांहीं मंडळीनें विनोदानें पण प्रेमपुरस्सर भावनेनें " गुलाबी साधु " हें नांव त्यांना दिलें होतें.

एके दिवशीं कै. साठयांच्या वाडयांत आम्ही सर्व मंडळी बसलों असतां हे गृहस्थ कै. नूलकरांना हिणवूं लागले कीं " बाबा मला आतांच म्हणाले कीं, **या म्हाताऱ्याची** ( नूलकरांना बाबा म्हातारा म्हणत असत ) **सेवा करीत जावी बरें !** " तर सांगा आतां तुमची ( नूलकरांची ) सेवा कशी काय करूं ती ? काय तुमची पाठ रगडूं ? कीं पाय चेपूं ? कीं चिलीम भरून देऊं ? ( याप्रमाणें श्री साईबाबांची सेवा इतर जन करीत असत त्यावरून कुत्सित चिकित्सेनें ) कीं चिरूट शिलगावूं ? बोला ? बोला ! काय करूं तें ? " कै. नूलकरांनीं शांतपणें हंसत हंसत जबाब दिला ' बाबांची लीला बाबाच जाणें" तेव्हां मित्राकडे वळून ते गृहस्थ म्हणाले " पाहिलेंत ? हें येथें एक ल्युनाटिक असायलम (वेडयांचें इस्पितळ ) आहे तें ? आणि तुमच्यासारखी शिकलीसवरलेली मंडळी येथें येऊन दुसऱ्यांची दिशाभूल करीत असते ती ! " अशाच प्रकारचे पुष्कळ शब्द हे टाकून बोलले. स्नेह्याला त्यांच्या पूर्वीच्या कृतीवरून राग आलाच असता, परंतु श्रींच्या वर वर्णन केलेला शिकवणीनें त्याला मुळींच राग न येतां त्यानें तें सर्व निमूटपणें सहन केलें. जरी कै. नूलकरांना इतरांप्रमाणें मधुमेहाच्या विकाराची व्यथा होती तरी त्यांच्या चर्येवर व शरीरावर इतरांस कांहीं दिसून आलें नव्हतें. त्यांची ती शांत चर्या व तें हंसतमुख आम्हां सर्वांच्या पूर्ण परिचयाचें आहे.

मुंबईस परतल्यानंतर कांहीं महिन्यांनीं असें कळलें कीं, वरील गोष्ट घडल्यानंतर कांहीं दिवसांनीं श्री. नूलकरांच्या पाटीवर एक भयंकर व्रण

उत्पन्न होऊन त्यामुळें त्यांचा अंत कांहीं दिवसांनंतर श्रींच्या पायापाशीं अत्यंत शांत व समाधान वृत्तीनें झाला.

या त्यांच्या शेवटच्या दुखण्यांत त्या " गुलाबी साधूनीं " नूलकरांची अशी अप्रतिम सेवा व शुश्रुशा केली कीं, तिचें वर्णन करणें अशक्य आहे. श्री नूलकर दुखणाईत होणार व त्यांची सेवा आपणांला करावी लागणार याची पूर्ण सूचना कांहींही बाह्य चिन्हें नसतांना आधींच देऊन, श्रीगुरुचरणीं वृत्ति स्थिर व्हावी यासाठींच आपणाला मर्जीविरुद्ध शिरडीस आणवून ही जी सर्व लीला प्रत्यक्ष दाखविली, तिचा पूर्ण अनुभव घेऊन त्या व इतर गृहस्थांचें मन श्रीसाई चरणीं असें उत्कृष्ट रीतीनें लीन झालें आहे कीं वाहवा !

हे एक विद्वान्, बहुश्रुत व अत्यंत चिकित्सायुक्त अध्ययन करणारांपैकीं आहेत. स्वतःची पक्की खातरी झाल्याखेरीज इतर करतात म्हणून आपण तसें करावें असें दुटप्पी वर्तन करणाऱ्यांपैकीं ते खचित नाहींत. त्यांना याप्रमाणें दाखले दाखवून पूर्ण रीतीनें आपलेंसें केलें ते पाहून स्नेह्याला, लेखकाला व इतरांना अत्यंत आनंद वाटल्यास आश्चर्य तें कोणतें ? आणि त्यामुळें त्यांची बाबांच्या पायीं श्रद्धा जडल्यास नवल तें कोणतें ?

वरील हकीकतीच्या सत्यतेविषयीं दुसरें कोणी नाहीं तर अमरावतीचे विद्वन्मणी व सन्मान्य गृहस्थ नामदार श्री. दादासाहेब खापर्डे अत्यंत आनंदानें साक्ष देतील. कारण त्या वेळीं त शिरडीस होते आणि हा प्रकार इतरांप्रमाणें त्यांच्याही देखत घडलेला आहे.

आतां दुसरे छडीवाले गृहस्थ यांच्यापासून मित्राला काय फायदा झाला आहे तो पाहूं या. हे गृहस्थ कांहीं विशेष शिकलेसवरल्यापैकीं नाहींत. साध्या वृत्तीचे आहेत. त्यांनीं " बाबासाहेब ! स्थितप्रज्ञ म्हणजे काय ? " याची पृच्छा इतक्या कंटाळयुक्त प्रकारानें केली कीं, मित्र

म्हणतो, तो त्याच्या देहांतापर्यंत कधींही विसरणार नाहीं. माझा मित्र मागें दर्शविल्याप्रमाणें एक मुंबई युनिव्हर्सिटीचा शास्त्रीय विषयांत प्रवीण झालेला ग्रॅज्युएट आहे. इ. स. १८८५ साली त्यानें डिग्री घेतली होती. प्रार्थना समाजाच्या शिकवणीमुळें त्याच्या मनावर उदार व प्रगल्भ परिणाम घडलेले होते. तरी साक्षात् ईश्वरप्राप्ति होईल काय ? याविषयीं त्याच्या मनाची तळमळ श्रीसाई माउलीचें दर्शन होईपर्यंत शांत झाली नव्हती.

चरितार्थासाठीं त्यानें व्यापारी मार्ग पतकरिला होता. आपले दक्षिणी लोक या व्यवसायामध्यें त्या वेळीं मुळींच पडत नसत. म्हणून त्याला वेळोवेळीं बऱ्याच थप्पडा बसल्या. तरी पण कै. रा. गो. भांडारकरांच्या उत्कृष्ट शिकवणीचा छाप त्याच्या मनावर जो बसला होता कीं, **परमेश्वर सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान् आणि हृदयस्थ आहे** हें तो कधींही विसरला नाहीं, आणि त्याच दृढतम विश्वासामुळें त्यानें संसारांतले सर्व आघात सहन केले होते.

असो ! जेव्हां त्या साधारण शिकलेल्या गृहस्थानें " स्थितप्रज्ञ म्हणजे काय ? " असा सरखा टाहो त्याच्या कानांजवळ फोडला, तेव्हां हें आहे तरी काय ? " स्थितप्रज्ञ तें काय ? " आपली इतकी उमर गेली ( त्या वेळीं त्याचें वय ४६ वर्षांचें होतें ) तरी आपल्या कानावरून हा शब्द कधीं गेलेला नाहीं याची त्याला साहजिक लाज वाटून त्यामुळें त्या विषयींचा विचार त्याच्या मनांत सुरू झाला. श्रीसाईबाबारूपि पूर्ण स्थितप्रज्ञाचें मूर्तस्वरूप डोळ्यांसमोर साक्षात् बसलेलें आहे हें त्याला त्या वेळीं कसें कळावें ? नाहीं श्री गीतेचें यत्किंचित् अध्ययन, नाहीं अध्यात्म हें काय व कशाबरोबर खातात याचा गंध !

परमकारुणिक श्री जगदीश अवतार घेत नसतो ही प्रार्थना समाजाची शिकवणूक ! तसें कां ? अनंतकोटि ब्रह्मांडाचा **सर्वशक्तिमान्** जो प्रभु त्याला भक्तासाठीं तसें करणें अशक्य कां ? या सर्व गोष्टींचा उलगडा श्रीसाई चरणांच्या दर्शनापूर्वी त्याला झाला नव्हता.

“ स्थितप्रज्ञ ” या शब्दानें त्याच्या मनाला चालना दिली. याच वेळीं चिपळूणकर मंडळीनें श्री मन्महाभारताचें मराठी भाषांतर छापण्याचें सुरू केलें होतें. त्या ग्रंथाचा तो एक ग्राहक झाला. जसजसें त्या पवित्र ग्रंथाचें एक एक पर्व प्रसिद्ध होऊन त्याच्या हातांत पडत गेलें तसतसें तो त्याचें पाश्चात्य शास्त्रद्वारें कसें काय जुळतें याचा पूर्ण चिकित्सक बुद्धीनें विचार करूं लागला. महाभारतांत तोच तोच विचार दोन तीन वेळीं निरनिराळ्या प्रकरणांत अशा कांहीं रीतीनें येत असतो कीं, त्याचा ठसा मेंदूवर कायमचा बसल्याशिवाय राहात नाहीं.

उदाहरणार्थ आकाशाचा गुण “शब्द” याचें विवेचन पुष्कळ वेळां आलें आहे. तो “शब्द” तो गृहस्थ पाश्चात्य शास्त्राबरोबर जुळवूं लागला. आकाश म्हणजेच ईथर. ईथर ही पाश्चात्यांची काल्पनिक वस्तु, पण आमचें पंचमहाभूतांपैकीं अनुभवसिद्ध मुख्य भूत, त्याचा गुण शब्द हा कसा ! याचा त्याला हट्ट घेऊन बसल्यावर त्याच्याच राहत्या घरीं श्रीसाई-कृपेनें कसा काय उलगडा होऊन त्याच्या मनाचें आनंदयुक्त रीतीनें कसें समाधान झालें त्याविषयीं पुढेंमागें श्रच्यीं इच्छेनें एखाद्या लेखांतून कळवि-ण्यांत येईल.

असो. श्री मन्महाभारताचीं पर्वे तो आस्थापूर्वक वाचूं लागला. त्यांत श्री मद्भगवद्गीता आहेच. तिच्यांत “ स्थितप्रज्ञाचें ” वर्णन आहेच, आणि सर्व प्रकारच्या उदात्त विचाराचीं लूटच लूट करावी तितकी थोडीच अशी या अप्रतीम ग्रंथांत आहे.

श्री मन्महाभारताच्या वाचनानें त्याच्या **मनावर व शरीरावर** आश्चर्यकारक परिणाम झाले,आणि त्यांतल्या त्यांत श्रीसाई माउलीचें प्रत्यक्ष दर्शन, स्पर्शन आणि आशीर्वादयुक्त स्फूर्ति व ती आश्चर्यकारक उदी, अशी सर्व जोडीच जोडी आणि गोडीच गोडी त्याला सद्गुरू कृपेनें प्राप्त झाली !

सारांश, मुख्य गोष्ट सांगावयाची सोडून मित्राचें स्तोम गाजविण्या-कडे लेखणींची प्रवृत्ति चालली होती तिला आळा घालून इतकेंच कळवावें

असें वाटतें कीं, त्या दोन्ही सद्‌गृहस्थांच्या मनांत त्या पांच मिनिटांच्या वेळांत श्रीनीं असा कांहीं विचाराचा लोंढा लाटला होता कीं, त्यामुळें मित्राचें जन्म-जन्मांचें सार्थक झालें आहे. ही सर्व लीला त्याच्यासाठींच श्रीनीं मुद्दाम घडवून आणली याची त्याला मुळींच शंका नाहीं. मायच ती ! काय तिचें तिच्या लंगडयालुल्या बालकांवरचें प्रेम तें ! त्या प्रेमाचें वर्णन कधींही करवेल काय ? "मूकं करोति वाचालं" हा प्रकार श्रींच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष शिकवणीमुळें त्यांच्या दरबारीं प्रत्यहीं पाहाण्यांत येत असे व अद्यापिहा येत आहे.

श्रीसद्गुरु साई माउलीच्या दिव्य पायापाशीं बसून आपणा सर्वांमध्यें काय अमर्याद सामर्थ्य आहे याची जाणीव दुसऱ्यांमध्यें याच आणि इतर वेळीं यथाशक्तिप्रमाणें जो उत्पन्न करविणार नाहीं त्याचें अध्यात्मिक अध्य-यन निखालस वरपांगी व व्यर्थ होऊन श्री साईबाबा म्हणत असत त्याप्रमाणें "आलं वारं गेलं वारं" अशाच प्रकारचा त्याचा जीवनप्रवाह होणार आहे.

श्रींच्या बाळगोपाळांना हें कधीं तरी इष्ट वाटेल काय ! आपण समर्थांचीं लेकरें ही जाणीव त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा संसार सहज रातीनें तरून जाण्याची त्यांना स्फूर्ति देत नाहीं काय ? म्हणूनच हा वेडाभावडा लेखक आपआपले अनुभव श्रीलीलेंतून कळवावे म्हणून त्यांना पदोपदीं आळवीत आला आहे.

आपल्या संसारांत घडलेल्या, घडणाऱ्या व घडतील त्या सर्व श्रीसांई माउलीच्याच लीला अशी ठाम खातरी झाली असतां आतां पुढची फिकीर कां करावी ? इतकें पाहून, करून व वारंवार गोड गोड अनुभव घेऊन आपलें आपल्या सद्गुरु माउलीवरचें प्रेम व्यक्त करावयाला कच कसली ? कदाचित् कोणी निर्भर्त्सना करील ? करो बापडा ! आपल्या भांडवलांत त्यामुळें कधीं तरी खूट पडणें शक्य आहे ?

आपला भोळाभावडा अनुभव प्रसिद्ध झाल्यामुळें जर अगदीं **एकाच** जीवाला त्यापासून आनंद झाला, आणि त्याच्या तयारीप्रमाणें त्याच्यांत स्फूर्ति उत्पन्न होऊन, त्याचा आत्मविश्वास वाढून त्याच्या पुढील प्रगतीला पूर्ण प्रोत्साहन व चलन मिळून, त्यामुळें श्रीच्या कृपेनें त्याचें कोट कल्याण झालें आणि तें तसें जरूर व्हावयाचेंच, तर त्यांत **आपल्या परमप्रिय सद्गुरु माउलीची वाहवा** नाहीं काय !

श्रीसद्गुरु साई माउलीचा त्रिकाळ जयजयकार होवो हीच अंतिम दृढवासना ठेवून अज्ञ लेखक हा लेख तिच्याच गोड पायांपाशीं अत्यंत विनम्रभावनेनें सादर करीत आहे.

"**म्हातारा**"

[ २ ]

" शामा ! जारे ! त्या भिंताडापलीकडे एक म्हातारा बसला आहे त्याच्याजवळ साखरेचा एक खडा आहे तो माझ्यासाठीं मागून आण रे !" माधवरावजी त्या प्रचंड गर्दीतून जाऊन पाहातात तों, शरीर मलीन व दुर्गंधीयुक्त, मान लटलट करीत आहे, तोंडांतून लाळ एकसारखी गळत आहे, छातीवर व्रण पडलेले, त्यांतून पू वाहत आहे, त्यावर माशा भण-भणत आहेत, असा त्या भिंतीच्या आडोशाला एक म्हातारा खरोखरीच बसला होता.

इ. स. १९१२ सालच्या नामसप्ताहाच्या वेळची ही गोष्ट. त्या म्हाताऱ्याचा हात धरून माधवरावजींनीं त्याला त्या भयंकर गर्दीतून बाबांजवळ आणलें.

बाबांच्या पायां तो किती आनंदानें पडला हें तें दृश्य पाहाणाराच जाणूं शकेल. लेखणी वर्णन करण्यास असमर्थ आहे. बाबांनीं त्याच्या माथ्यावर आपला वरदहस्त ठेवला. नंतर त्या गड्यानें आपल्या अंगावरच्या या घाणेरड्या पटकुराच्या एका कोंपऱ्यांतील एक गांठ सोडून एक लहानसा

साखरेचा खडा काढला, आणि कांपऱ्या हातांनीं तो बाबांच्या हातांत ठेवला. बाबांनीं तो तात्काळ आपल्या तोंडांत टाकला !

बाबासाहेब ! मी त्या वेळीं तेथें हजर होतें आणि हा सर्व प्रकार पाहून माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू सारखे वाहूं लागले. या आपल्या सांई मायची लीला मी तोंडानें काय वानूं ! ”

वरील हकीकत आज संध्याकाळीं श्री सावित्रीबाई तेंडुलकर घरीं आल्या होत्या त्या वेळीं श्रीसांई माउलीच्या ज्या गोडलीला त्यांनीं सांगितल्या त्यांपैकीं ही त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत सेवकाला सांगून ती प्रसिद्ध करण्याची त्यांनीं परवानगी दिली.

ही व इतर गोष्टी सांगतांना श्री सावित्रीबाईंचा कंठ भरून आला, आणि त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले होते.

श्री सावित्रीबाई एक पहिल्या प्रतीच्या कवियत्री आहेत. त्यांची सुप्रसिद्ध “ भजनमाळा ” श्रीसांई चरणाच्या ठायीं त्यांच्या एकनिष्ठ प्रेमाचें एक उत्तमोत्तम द्योतक आहे हें सांगणें नलगे.

जर म्यानशन<br>वांद्रें ता. १८<br>फेब्रुवारी १९३१

रा. आ. तर्खड<br>संपादक<br>श्री. साईलीला

( ३ )

" काका ! आपल्या दरबारांत खटनट, दुष्टदुष्ट सगळ्या प्रकारचीं माणसं येतात, आपल्याला त्यांच्यावर सारखी नजर ठेवावी लागते बरं का ! "

हे शब्द श्रीसाईबाबांच्या मुखांतून अनेकवेळां निघालेले अनेकांनीं ऐकले आहेत, आणि त्यांचे प्रत्येकाच्या मनावर विशिष्ट परिणाम घडले आहेत.

इ. स. १९१५ सालच्या दसऱ्याच्या सुमाराला लेखकाचा स्नेही श्रींच्या पायांपाशीं बसला असतां हे शब्द श्रींच्या दिव्य मुखांतून निघाले होते.

दुपारच्या दोन अडीचाचा सुमार असावा. पांच दहा मिनिटांपूर्वी त्याच्या मालकाच्या पेढीवरचा दुय्यम मुनीम श्रींच्या दर्शनाला येऊन पायां पडला होता. या इस्थानें कापसाचा खाजगी सट्टा केला होता; त्यांत बूड येऊन आपल्या यजमानाच्या शिल्केचा दुरुपयोग व अफरातफर करून तो परागंदा झाला होता, आणि त्यामुळें पोलिसांतून त्याच्यावर पकड वॉरंट निघालें होतें.

श्रींच्या दरबारांत त्याला कोणी आणलें होतें. त्याला पाहातांक्षणींच स्नेही चपापला. कारण त्याच्यावर पकडवारंट सुटल्याचें त्याला ठाऊक होतें. त्यामुळें त्याच्या मनाची पुष्कळ चलबिचल झाली. क्षणभर त्याला असेंही वाटलें कीं, उठून जाऊन पोलीसला वर्दी द्यावी. कारण तसें न केल्यास पुढेंमागें ही हकीकत आपल्या मालकाला कळल्यावर त्या मनुष्याच्या कृत्यावर ढांक पिछाड केल्याचा स्वतःवर आरोप येण्याचा पूर्ण संभव होता. उपरांत त्याला पकडून देण्याबद्दल बक्षीसही ठेवण्यांत आलें होतें. त्यामुळें हा मनुष्य कोण आहे हें कोणापाशीं बोलतांही येण्यासारखें नव्हतें.

तशांत श्रींच्या पायां पडल्यावर तो तेथेंच श्री समोर स्नेह्याच्याही पायां पडला, आणि त्यामुळें त्याचा विशेष गोंधळ झाला. कारण जो तो त्याविषयीं मित्राजवळ खुणेनें विचारपूस करूं लागला. त्यानें ओळखीचा मनुष्य आहे इतकेंच सुचविलें, पण त्यामुळें इतरांचें समाधान झालें नव्हतें,

कारण त्याच्या चर्येवर त्याच्या मनाची चलबिचल दिसत होती असें मागाहून त्याला कळलें.

हा सर्व प्रकार पाहून श्रीसाईबाबांनीं त्याची एक सार्वजनिक गोष्ट सुरू केली. तिच्यांत हमेशप्रमाणें **बारूळ, वाणी, तेली, तांबोळी, पाटील, कुळकर्णी** हे शब्द होतेच. ती गोष्ट चालू असतांना या लेखाच्या सुरवातीला लिहिलेले शब्द बाबांनीं स्पष्टपणें उच्चारिले. ते ऐकतांक्षणींच मित्राच्या मनाची चलबिचल बरीच थंडावली, तरी पण ती कायमची नष्ट झाली नव्हती. ही गोष्ट कानांवर जातांच आपला मालिक आपणाला काय म्हणेल ? त्याचा आपल्यावर जो अकृत्रिम भरंवसा आहे तो राहील काय ? वगैरे प्रश्नांचें काहूर त्याच्या मनांत सारखें माजलें होतें.

वरील शब्द उच्चारिल्यानंतर तो इसम दूर प्रदेशांतून धांवपळ करीत श्रीच्या चरणाजवळ भुकेतान्हेला शरण आला आहे हें न सांगतां जाणून, त्याला आधीं जेवून खाऊन घेऊन, नंतर परत भेट घेण्याला त्यां कनवाळू श्रीसाई माउलीनें त्याला सांगितलें.

श्री काकासाहेब दीक्षितांनीं जेवणाखाण्याची त्याची सोय लावली; आणि नंतर त्याला श्रीच्या दर्शनाला पुन्हा आणलें. श्रीनीं काकासाहेबांना कांहीं निमित्तानें मशिदींतून बाहेर पाठविलें आणि तो आणि आपण असे दोघेचजण तेथें राहिले. श्रीनीं त्याला काय आज्ञा केली हें त्या वेळीं कोणालाही कळलें नाहीं. परंतु शिरडीहून ताबडतोब निघून जाण्याची आज्ञा केली हें मात्र आम्हाला कळलें.

इकडे स्नेह्याचा जीव ठिकाणीं नव्हता. श्रीसाई त्याला दोन तीनदां म्हणाले " असा घाबरतोस कां ? " परंतु त्यानें त्याचें पूर्ण समाधान झालें नव्हतें.

शिरडीला चार दिवस राहून नंतर मुंबईस आल्यावर मालिकाची गांठ घेतल्याबरोबर शिरडीची सर्व हकीकत त्यानें सांगितली; आणि आपण

श्रींच्या दरबारांत असल्यामुळें त्या इसमाविषयीं आपण पोलिसांत वर्दी दिली नाहीं हें पण कळवून मालिकाची त्याबद्दल क्षमा मागितली.

त्याच्या मालिकाचा स्वभाव अत्यंत तापट असल्यामुळें जो तो त्याच्या पुढें जावयास स्वाभाविकपणें भीत असे, परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, मित्रावर मुळींच न रागावतां त्याचा मालिक त्याला म्हणाला कीं, श्रींच्या दरबारांत त्यानें जें वर्तन केलें तेंच योग्य होतें ! हें ऐकतां क्षणींच श्री साई माउलीचीच ही प्रेरणा असावी असें जाणून त्याच्या डोळ्यांत प्रेमाश्रु आले.

ही गोष्ट घडल्यानंतर महिन्याभराच्या आंत तो इसम आपल्या धन्याच्या घरीं गेला आणि त्याचे पाय घट्ट धरून क्षमा मागितली. मालिकानेंही उदार वृत्तीनें पोलिसच्या कामांत बनेल तितका नम्र प्रकार करवून त्याला जितकी थोडी सजा होईल इतकें केलें. घोटाळा कांहीं लहान सहान नव्हता, दीन अडीच लाख रुपयांचा होता.

मालिकानें इतका नरमपणा वापरण्याचें कारण मागाहून असें समजलें कीं, त्या गुन्हेगाराला, वणवण करीत देशोदेशीं भटकत राहण्याचें सोडून देऊन मुंबईंत जाऊन मालकाचे पाय घट्ट धरून क्षमा मागण्याची सल्ला शिरडींत श्री सांईबाबांनीं त्याला दिली होती आणि त्या प्रमाणें त्यानें केलेंही.

हा त्याच्या आणि बाबांच्यामध्यें झालेला प्रकार जेव्हां त्यानें त्याच्या मालिकाला सांगितला त्या वेळीं त्याच्या अंतःकरणास पीळ पडून त्याला जितकी कमी शिक्षा होईल तितकीच व्हावी याविषयीं त्यांच्याकडून यत्न झाला.

गुन्हेगाराविषयीं देखील अत्यंत ममतेनें श्री सांईमाउलीनें ही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रदबदली केली नाहीं काय ?

“ अपिचेत्सुदुराचारो........ ” या श्री भगवदुक्तीचें हें स्पष्टीकरण नाहीं तर काय ?

श्री सांईमाउलीवर त्यांच्या बाळगोपाळांचें प्रेम बसल्यास आश्चर्य तें कोणतें !

“ म्हातारा ”

(४)

श्रीयुत सुंदरराव नवलकर संस्थानचे ऑनररी सेक्रेटरी आज दोन-प्रहरीं कचेरींत भेटले. त्यांनीं त्यांच्या मित्र व आप्त मंडळीची घडलेली हकीकत सांगितली:—

ही मंडळी बहुधा नाताळांत अथवा ईस्टरच्या सुटींत साकोरीस उपासनीच्या भेटीस जात असतात.

साकोरीहून परत फिरतांना श्री शिरडीस उतरून श्रींच्या समाधीचें दर्शन घेऊन नंतर पुढें जावें असा त्यांचा क्रम आहे.

सुमारें दोन वर्षांमागें साकोरीहून परत फिरतांना त्यांच्यापैकीं कांहीं मंडळीचा आग्रह झाला कीं, श्रींच्या समाधीचें दर्शन घेऊन पुढें मुंबईस जावें; परंतु त्यांतल्या दुसऱ्या कांहीं मंडळीला स्टेशन गांठावयास उशीर होईल या भीतीनें तसें करणें योग्य दिसेना. भवति न भवति चालत होती इतक्यांत शिरडीच्या श्री खंडेरावाच्या देवळाजवळ मोटर येतांच तिची एक टायर पंक्चर होऊन मोटर थांबविणें भाग पडलें.

मंडळी उतरून श्रीसाईबाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन परत फिरली, इतक्यांत टायर दुरुस्त होऊन मोटार 'चालू' झाली व त्यांना मुंबईची गाडी वेळेवर मिळाली.

गेल्या नाताळांत याचप्रमाणें साकोरीहून परत जातांना शिरडीला उतरून नेहमींप्रमाणें श्रींच्या समाधीचें दर्शन घेऊन पुढें मुंबईस जावें या हेतूनें मोटरवाल्यास शिरडी येथें मोटर थांबविण्यास सांगितलें. शिरडीजवळ येतांच मोटरवाला गाडी उभी करीना. कांहीं केल्या ऐकेना. मंडळी श्रींच्या समाधि मंदिराला दुरून नमस्कार करून दिलगिरीनें पुढें गेली.

कोपरगांवाजवळ लगबग एक दोन मैलाचें अंतर असावें, इतक्यांत मोटरच्या इंजिनांत एकाएकीं बिघाड होऊन, तें दुरुस्त होईपर्यंत सुमारें दीड तासावर खोटी झाली. मोटरवाल्याला त्यामुळें अत्यंत पश्चात्ताप झाला.

मुंबई ता. ११-२-३१ } सुंदरराव दीनानाथ नवलकर

(५)

श्री. रा. स. बोरकर हे श्रीसाई लीलेचे ग्राहक आहेत. सालसेट सेंट्रल रेल्वे जी अंधेरीहून निघून कुर्ल्यावरून तुंर्भ्याच्या डोंगराच्या पायथ्याजवळ आणिक नांवाचें एक खेडें आहे तेथपर्यंत नेलेली आहे, त्या रेल्वेचे श्री. बोरकर हे ती रेल्वे चालू असेपर्यंत चीफ इंजिनियर व ट्रॅफिक मॅनेजर होते.

सरकारनें गेल्या वर्षाच्या एप्रिल महिन्यापासून ही अति उपयोगी रेल्वे बंद केली त्यामुळें साष्टी बेटांतल्या दक्षिण भागांतल्या मध्यवर्ति खेडयांतून राहाणाऱ्या लोकांची अत्यंत गैरसोई झाली आहे.

श्रीयुत बोरकर यांचे अंक त्यांच्या नांवावर कुर्ल्याच्या पत्त्यावर पाठविण्यांत येत असत, परंतु सदरील रेल्वे बंद झाल्यामुळें कुर्ला स्टेशनवरचें त्यांचें ऑफिस बंद झालें. राहता पत्ता न कळविल्यामुळें कुर्ल्याच्या पत्त्यावर त्यांना पाठविलेले अंक टपालांतून परत येऊं लागले. ज्यामुळें वर्गणी भरली असतांनाही श्रीसाई भक्ताला त्याचे अंक मिळूं नयेत याची जाणीव असल्यामुळें लेखकाच्या मनाला सारखी रुखरुख लागली होती.

सरतेशेवटीं गेल्या महिन्यांत कुर्ल्याच्या स्टेशनमास्तरला व व्हिक्टोरिया टर्मिनसवर जी. आय्. पी. रेल्वेच्या ट्रॅफिक मॅनेजरला पत्रें लिहून श्री. बोरकरांचा सध्यांचा पत्ता कळविण्याविषयीं लिहिलें. कांहीं दिवसांनीं दोन्ही इसमांकडून पत्ता माहीत नाहीं अशीं उत्तरें आलीं.

गेल्या जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयांत श्री. शिरडी संस्थान कमिटीची एक सभा रा. ब. मोरेश्वर वि. प्रधान यांचे घरीं सांताक्रूझ येथें संस्थानच्या कामासाठीं बोलाविण्यांत आली होती. त्यावेळीं शिरडी येथील श्री. माधवरावजी देशपांडे आले होते. श्री. माधवरावजी दोन दिवसांनीं लेखकाचे घरीं आले होते, त्या वेळीं श्री लीलेचा विषय संभाषणांत येतांच ते म्हणाले कीं, सौ. चंद्राबाई बोरकरांचे घरीं पार्ल्यास ते

गेले असतां बाईंनी तक्रार केली (कीं,) लीलेचे अंक त्यांना अलिकडे मिळाले नाहींत.

वर्गणीदारांची यादी तपासतां सौ. चंद्राबाईचें नांव पटांत मिळेना. तेव्हां श्री. माधवरावजींच्या भेटीविषयीं सौ. चंद्राबाई यांजला पत्र लिहून पाठविलें, त्याचें उत्तर श्रीयुत बोरकर यांचेकडून आलें कीं, सौ. चंद्राबाई या त्यांच्या चुलती आहेत, व आपण वर्गणीदार असून आपल्या नांवावर आलेल्या प्रती त्या बाई वाचीत असतात. यावरून सर्व खुलासा होऊन मनाला आनंद वाटला आणि टपालमार्फत सर्व प्रती श्री. बोरकरांकडे त्यांच्या राहत्या घराच्या पत्त्यावर पाठवून दिल्या.

या अनुभवांविषयीं आधुनिक मंडळी Oh ! these are mere concidences ! (म्हणजे या गोष्टी निव्वळ अचानक घटना घडून आलेल्या प्रकारापैकीं) असें म्हणतात. पण या अचानक घटना नव्हेत असें आध्यात्मिक शास्त्राचें अध्ययन करणारे छातिठोकपणें बोलूं शकतात; आणि त्यामुळेंच श्रीसाईबाबांचे भक्तांस यांत श्रीसाईबाबांच्या लीला दिसतात, व संसारांत असलेल्या आपल्या बाळगोपाळांना त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करून त्यांना आपल्या चरणीं प्रेमपूर्वकभावनेनें ते कसे दृढतर रीतीनें बांधून ठेवीत असतात याचें प्रत्यक्ष दिग्दर्शन होतें.

रा. आ. तर्खड.

संपादक—

श्रीसाईलीला.

# पिशाचयोनि

"ए! ऊठ तिकडून!" हे शब्द ऐकतांच मी बराच गोंधळून गेलो. त्या वेळीं रात्रीं बाराचा सुमार होता. पौर्णिमेचें चांदणें इतकें शुभ्र व लख्ख पडलें होतें कीं, जमिनीवर पडलेली टांचणी देखील दिसली असती. बहिर्दिशेसाठीं कै. दीक्षितांच्या वाडयामागें वडाच्या झाडाखालीं मी बसलों होतों.

आवाज खणखणीत आणि स्पष्ट, आजूबाजूला कोणीही दिसत नव्हतें. किंचित् थोडया वेळापूर्वीं जवळच्या पातेऱ्यांत कांहीं सळसळ असा आवाज झाला होता तिकडे लक्ष `लें होतें. न जाणो कांहीं साप असेल म्हणून.

हा अस्खलित हुकमीं शब्द ऐकल्याबरोबर इकडे तिकडे पाहूं लागलों. कोणी दिसेना, आवाज तर अगदीं जवळचा, वीस पंचविस हातां-वरचा होता.

इतक्यांत पुन्हा " उठतोस कीं नाहीं ! कीं येऊं ! हे शब्द त्या वडाच्या झाडावरून आले. वर पाहूं लागलों तेव्हां सफेत वस्त्रयुक्त कांहींसें दिसल्याचा भास झाला.

गांवकऱ्याचें पोर झाडावरून थट्टा करीत असावें असें वाटलें आणि थोडा रागही आला. इतक्यांत झाडावरून एका आकृतीनें उडी टाकल्याचा भास झाला. ही आकृति साधारण मनुष्यासारखी दिसत होती. ती सुमारें पंचवीस तीस हातांवर होती. खणखणीत आवाजानें ती आकृति पुन्हा म्हणाली " उठतोस कीं नाहीं ! ही हद्द माझी आहे ! मुकाटयानें उठून जा ! " असें म्हणून जवळ येऊं लागली.

मनांत चर्र झालें. भ्यालों. उठून पळून जावें असेंही वाटलें. इत-क्यांत "त्या म्हाताऱ्याच्या जीवावर उडया मारतोस काय ! पाहातों तर—" असें म्हणून ती आकृति झपाटयानें जवळ येऊं लागली.

हें सर्व बोलावयास वेळ लागतो पण तितक्यांत **“ त्या म्हाताऱ्याच्या जिवावर ”** हे शब्द ऐकून अत्यंत समाधान वाटून, स्फूर्ति झाली, वाचा फुटली, आणि आवेशानें उत्तर दिलें “ ये पाहूं ! दाखीव पाहूं काय करतोस तें ! माझा म्हातारा तुझें काय करील तें बघावयाचें असेल तर ये ! ”

हे शब्द उच्चारितांच ती आकृति जागच्या जागीं उभी राहिली. मी जाणलें कीं, हें कोणी तरी पिशाच्च असावें. पण बाबांची आठवण होतां क्षणींच सर्व भीति नाहींशी होऊन, शरीरांत मनस्वी अवसान आलें.

“ ये ! आतां उभा कां ! माझे बाबा तुझें भस्म करतील ये ! ये !

ती आकृति हासली. आणि जसें एखादें लांबलचक कापड जमिनीपासून झाडावर त्याप्रमाणें होऊन ती आकृति तेथें त्या झाडावर नाहींशी झाली.

नंतर स्वस्थ चित्तानें बिऱ्हाडाकडे वळलों. मनांत येणेंप्रमाणें विचार आले.

१ पाहिलें तें मनुष्य नव्हतेंच नव्हतें. पण पिशाच्च होतें खास !

२ त्याच्याबरोबर प्रत्यक्ष बोललों.

३ प्रथमतः घाबरलों, इतक्यांत श्रीसाईबाबांची आठवण होतां क्षणींच, भीति पार नाहींशी होऊन मनाला धीर येऊन समाधान वाटलें.

बिऱ्हाडीं आलों. आई जागत होती. तिला हें सर्व सांगावें असें वाटलें. पुन्हा उगाच तिला भीति वाटेल म्हणून सांगूंच नये असें वाटून थोडया वेळानें स्वस्थ झोंपीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं स्नान वगैरे आटोपून जेव्हां श्रींच्या दर्शनासाठीं गेलों तेव्हां बाबा म्हणाले,

" भाऊ तूं रात्रीं काय पाहिलंस रे ? "

" होय बाबा पाहिलं खरं. "

" मग भ्यालास का ? "

" बाबा ! पहिल्यानं घाबरलों; पण इतक्यांत तुमची आठवण झाली तेव्हां अवसान आलं. "

" अरे वेड्या ! तो मींच होतों. "

" बाबा ! तें भूत होतं. "

" अरे तो मींच होतों ! "

" तुम्हीं कांहीं तरी बोलतां. तें कसं होईल ? "

" या तुझ्या आयेला विचार ! "

ती म्हणाली " भुतंखेतं सर्व बाबांच्या आधीन आहेत ना ! "

" आणि त्या सगळ्यांमध्यें मी असतुं ना ? " बाबा म्हणाले, " अरे भुतंखेतं आपल्याला कांहीं नाहीं करायचीं असं तुला गतसालीं सांगितलं होतं ना ? "

ही हकीगत इ. स. १९१८ साल्च्या वैशाखांत घडली. त्या वेळीं माझ्या स्नेह्याची बायको आणि तिचा धाकटा मुलगा हीं उभयतां माय-लेंकरें श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं गेलीं होतीं.

त्यांना श्रीनीं समाधीच्या दक्षिणेकडची खालची खोली देवविली होती. वाड्याचें काम अद्यापि अपुरेंच होतें. वास्तु व्हावयाची होतीं. तरी पण या मायलेंकरांस त्या वाड्यांत राहावयाचा पहिला मान श्रीनीं देवविला होता हें कांहीं गांवकऱ्यांना आवडलेंही नव्हतें. असो.

ही गोष्ट येथें लिहावयाचा मुख्य हेतु हा कीं,

१ भुतेंखेतें यांचें अस्तित्व खरें आहे.

२ या त्यांच्या अस्तित्वामुळें मरणोत्तर दुसरी अवस्था आहे हे उघड दिसून येतें.

३ कांहीं विशिष्ट मनुष्यांना कारणप्रसंगीं या योनींतल्या आकृतीचें दर्शन होतें.

४ साधकाला सिद्धावस्थेंत जातांना या योनींतल्या जीवांचें दर्शन, स्पर्शन वगैरे प्रकार तादात्म्य भावनेनें अनुभवावे लागतात.

५ त्यानंतर पूर्ण सिद्धावस्थेंत या योनींतल्या जीवांचा उद्धार वगैरे करण्याचा म्हणजे त्यांच्या पुढील कार्य व मार्गक्रमणाची व्यवस्था लावण्याचा अधिकार प्राप्त होतो.

६ जगन्नियंत्या प्रभूवर पूर्ण विश्वास ठेवला असतां आणि त्याचें चिंतन केलें असतां, या योनींतले जीव, कांहीं अपाय करूं शकत नाहींत.

याविषयीं यथाशक्ति विचार करूंया.

कोणी असेंही म्हणतील कीं, श्री साईबाबासारख्या दिव्य पुरुषाच्या पायांपाशीं भक्तिमुक्तीचे प्रकार व अनुभव यांचें विवेचन करण्याचें सोडून या भुताखेतांच्या गोष्टी कशाला ? या गोष्टी म्हणजे ज्यांना इंग्रजी भाषेंत morbid thoughts ( हीन, रोगट विचार ) म्हणतात अशांतल्या असल्यामुळें त्याज्य समजाव्या.

हा प्रकार असा आहे कीं, कितीही विद्वान् असला तरी त्याच्या आयुष्यांत अशा कांहीं गोष्टी घडलेल्या असतात, कीं, त्यांचा उलगडा आधुनिक शास्त्रद्वारें होऊं शकत नाहीं. तेव्हां Oh ! it is the effect of centuries of inherited morbid thoughts ( म्हणजे शतकानुशतक आनुवंशिक परंपरेच्या या हीन विचारामुळें मनाची तशी वृत्ति होते ) असें म्हणून ते वेळ मारून नेतात.

पुष्कळांना याविषयीं जाहीर रीतीनें चर्चा करणें हें मानसिक दुर्बलतेचें एक द्योतक आहे असें वाटून, सध्यांच्या पाश्चात्य संस्कृतीप्रमाणें ते तसें असल्याचा बाह्य आविर्भाव दाखवितात.

असें जरी आहे तरी १३ व्या आंकड्यासारख्या क्षुल्लक बाबतींत पाश्चात्यांचें प्रचलित व मानसिक वर्तन किती खेदकारक आहे याचा मात्र ते विचार करीत नाहींत.

खुद्द लंडन शहरांत आणि इंग्लंड–स्कॉटलंडच्या सर्व शहरांत तसेंच खेड्यापाड्यांत, घरांच्या नंबरावर १३ चा आंकडा पाहाण्यांत यावयाचा नाहीं. १२ आंकड्यानंतर १२ A असा आंकडा पाहाण्यांत येतो. नंतर १४ चा.

१३ स्त्रिया अथवा पुरुष चांगलीं शहाणीं शिकलेलीं, विद्वान्, मेंबर ऑफ पार्लमेंटमधलीं, एके ठिकाणीं सहजासहजीं पण जेवावयास बसलेलीं पाहाण्यांत यावयाचीं नाहींत. अशा प्रकारचे धर्मभोळेपणाचे आचार पाश्चात्यांच्या वर्तणुकीमध्यें दिसून येतात कीं, ज्याविषयीं आपणांला अत्यंत आश्चर्य वाटतें.

म्हणून केवळ पाश्चात्यांना वाटतें म्हणून morbid (हीन, रोगिष्ट) ही विचारसरणी सोडून आपण प्रांजळपणें विचार करूं या.

इतर प्राण्यांपेक्षां मनुष्याला बुद्धि व वाचा या दोहोंची जोड असल्यामुळें, त्याची विचारशक्ति विशेष प्रगल्भ असणें साहजीक आहे. पाश्चात्यांचें त्यांतल्या त्यांत असें एक अनुमान आहे कीं, मनुष्याला ज्याप्रमाणें पांच ज्ञानेंद्रियें आहेत, त्याशिवाय उंच जातींतल्या पश्वादिक प्राण्यांना एक ( sixth sense ) एक सहावें ज्ञानेंद्रिय असावें, ज्यामुळें त्यांना भावी संकटाची सूचना होते, ती मनुष्याला सहसा होत नाहीं.

मनुष्यप्राणी मृत्युवश होत असतो त्या वेळीं त्याचें हालणें चालणें इत्यादि क्रिया बंद होत जातात. डोळ्यांपुढें अंधारी येते, कानांतीं ऐकूं

येत नाहीं, क्वचित् प्रसंगीं या मृत्यूच्या वेळेपासून परावृत्त झालेलीं मनुष्यें असें सांगतात कीं, त्या वेळीं त्यांच्या कानांजवळ उच्चारलेले शब्द अगदी अस्पष्ट व दुरून बोललेले असे भासतात. सारांश, हुषार मनुष्य निद्रावश होतांना जसें त्याला अस्पष्ट दिसूं लागतें, व ऐकूं येतें, तोच प्रकार मृत्यु-समयीं होतो. परंतु मृत्यु ही महानिद्रा होय. हमेशच्या निद्रेंत जें शरीर सचेतनयुक्त असतें तें या महानिद्रेंत तसें नसून त्या शरीरांतलें चैतन्य नष्ट झालेलें असतें.

हें चैतन्य काय आहे ? तें जातांना आम्हांला दिसत कसें नाहीं ? सबब हें कांहीं नाहीं. This is the result of mere chemical action in the body ceasing to operate. ( हा परिणाम शरीरांतर्गत चाललेल्या रासायनिक क्रिया लुप्त झाल्यामुळें ) पण या रासायनिक क्रिया कोणाच्या आधारावर चालतात ? यांचा मात्र विचार करावयाचा नाहीं.

शरीराबाहेर चैतन्य पडल्याचें दिसत नाहीं. सबब आत्मा वगैरे सर्व झूट गोष्टी आहेत, असें पाश्चात्य संस्कृतियुक्त कांहीं आधुनिक डॉक्टर-मंडळीमध्यें आढ्यतापूर्वक बोलणारे आढळतात.

शरीरांतून गेलेला दिसत नाहीं सबब आत्मा वगैरे नाहीं ही विचार-सरणी तरी खरी आहे काय ?

प्रत्यक्ष चर्मचक्षूंनीं मनुष्याला त्याच्या हयातींत न दिसणाऱ्या अशा अनेक वस्तु आहेत.

१ पाणी वगैरे दिसणाऱ्या वस्तूंची ऊष्णतेनें वाफ झाल्यावर ती दिसते काय ?

२ नवीन शोध लागलेले X (एक्स) अथवा Utra violet Rays ( जांभळ्या किरणांच्या पलीकडचे ) किरण दिसतात काय ?

३ १००० एक हजार ( candle Power ) मेणबत्त्यांच्या एकत्र समुदायाच्या उजेडाकडे एका हाताच्या अंतरावरून पाहातां येईल ?

४ माध्यान्हीच्या सूर्याकडे एक क्षणदेखील पाहावेल ?

वरील वस्तु व प्रकार साक्षात् अस्तित्वांत आहेत तरी आपले चर्म-चक्षु ते पाहाण्यास समर्थ नाहींत.

बरें दिसतें तेंच खरें असें क्षणभर मानलें तर—

मृगजळांतील पाणी खरें ?

पाण्यानें भरलेल्या भांड्यांत एक सरळ काठी कांठाला टेंकून ठेविली असतां ती मोडलेली दिसते.

३ समुद्राकडे पाहात असतां ती भली थोरली आगबोट क्षितिजा-पलीकडे गेलेली दिसत नाहीं. ती अजीबात नाहींशी झालेली असते ?

४ सायंकाळीं सूर्य पाण्यांत बुडालेला दिसतो तो नष्ट झालेला असतो ?

५ तो सकाळीं पूर्वेकडे उगवतो तें कसें ?

६ रात्रीं आकाशांत तारा तुटलेला पाहातों. तो, जे असंख्य ब्रह्मांडाचे सूर्यरूपि प्रचंड आकाराचे तेजोमय पुंज आहेत त्यांपैकींच एक असतो काय ?

त्याच प्रमाणें कर्णेंद्रियांचे प्रकारः—रात्रीं अथवा दिवसा "आकाशांत काय सुरेख गाणें चाललें आहे हो" असें एखाद्या साधारण मनुष्याला सांगितलें तर तो हांसेल आणि म्हणेल कीं, बोलणाराचें डोकें ठिकाणावर नाहीं. परंतु रेडिओच्या पेटीचा स्विच ( चावी ) फिरविल्याबरोवर त्याक्षणीं दुनियेंतल्या कोणत्याही शहरांतलें गाणें जें Broadcst ( आकाशांत फैलावलें जात असतें) तें तात्काळ अनुभवास येतें. स्विच बंद केला असतां जरी प्रत्यक्ष ऐकूं येत नाहीं तरी आकाशांत गाणें चालूच असतें ना ?

पूर्ण ब्रह्मवेत्त्या श्रीसांईबाबांसारख्या दिव्य पुरुषांना दूरचें बोलणें ऐकूं येणें व दूरचें दिसणें या गोष्टी खऱ्या आहेत. आकाश तत्वाचें त्यांनी

पूर्ण आकलन केलें असल्यामुळें त्यांच्या डोळ्यांना व कानांना विशेष प्रकारच्या यंत्रांची गरज लागत नाहीं.

त्यांना मृतांचे वासनात्मक देह दिसतात. कांहीं स्त्रीपुरुषांनादेखाल कांहीं प्रसंगीं हे देह दिसतात.

प्राण्याचें देहांत होतें तेव्हां त्याच्या वासनानुसार त्याचा सूक्ष्म देह निरनिराळे स्थूल देह त्याला पुन:पुन: प्राप्त करावयाला लावतो. आणि जेव्हां त्याप्रमाणें करतां करतां जन्मोजन्मींच्या या फिरण्याचा कंटाळा येऊन, आपण कोण, कोठले, येथें कशाला आलों, आतां पुढें काय करावयाचें या विचारांची मालिका, परंपरेच्या जन्ममरणाच्या यातनांमुळें येऊन, त्याच्या-पुढें दत्त उभी राहाते, मनाला समाधान वाटत नाहीं, तळमळ सारखी लागते, तेव्हां त्याच्यामध्यें असलेलें श्री परमेश्वराचें स्वरूप त्याच्यावरील प्रकारच्या विवंचनेवर लुब्ध होऊन त्याला आपलें खरें स्वरूप ओळखण्याला प्रवृत्त करितें.

इंद्रियरूपि खेळण्याचा त्याला कंटाळा येऊन, हीं इंद्रियें, हें शरीर, हें मी नव्हे असा त्याचा एकसारखा विचार सुरू झाला म्हणजे श्रीसाई-बाबांसारखीं त्या कारुणिक परमेश्वराचीं दिव्य रूपें त्याला जवळ ओढून त्याच्या तयारीप्रमाणें त्याला मार्गदर्शक होऊन त्याच्या देहपतनानंतर त्यांना अशीं शरीरें धारण करण्यास मदत करतात कीं, तेणेंकरून त्यांची भगवत् प्राप्तीची इच्छा उत्तरोत्तर अनिवार होऊन त्यांना त्यांच्या खऱ्या पूर्ण स्वरूपाचें ज्ञान, दर्शन, आणि अनुभव प्राप्त होऊन त्यांच्या करवीं आपल्याप्रमाणें जगाचें कोटकल्याण त्यांना करतां यावें.

(अपूर्ण)

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

## श्री शिरडी संस्थानचा ६ वा, ७ वा, व ८ वा, म्हणजे शके १८४९--५० व ५१ सालचा त्रैवार्षिक तौलनिक अहवाल.

१ या त्रैवार्षिक अहवालाचे मुदतींत संस्थान कमेटीच्या एकंदर १५ सभा श्री शिरडी, वांद्रें व सांताक्रूज या तीन ठिकाणीं मिळून झाल्या. त्यांत ज्या महत्वाच्या विषयांचा विचार व निर्णय झाला त्यांचा गोषवारा खाली दिला आहे.

२ लेंडीच्या जागेंत लावलेल्या फुलझाडांस व फळझाडांस पाणी देण्याकरितां लोकल बोर्डाकडून नजीकच असलेल्या बोर्डाच्या विहिरीचें पाणी घेण्यास परवानगी मागण्याचें पूर्वी ठरलें होतें. त्याप्रमाणें परवानगीचा अर्ज बोर्डाकडे करून बोर्डाची परवानगी मिळविली आहे.

३ सदर विहिरीचें पाणी त्या विहिरीवर पंप टाकल्यावांचून लेंडी जागेंतील बागेस देतां येणार नाहीं. करतां त्याच्या खर्चाकरतां रक्कम मंजूर करण्याचे कामाची व पंप खरेदी करण्याच्या कामाची तजवीज चालू आहे. तूर्त सदर बागेस गांवांतील नजीकच्या विहिरीचें पाणी खुद्द त्याच कामासाठीं ठेवलेल्या संस्थान नोकराकडून आणवून घालण्याची तजवीज होत आहे.

४ सदर लेंडी बागेस व लोकलबोर्ड विहिरीस लागून सरकारी मोफत नंबरची जागा आहे. त्यापैकी सुमारें १०-११ गुंठे जागा फुल व फळ

झाडाकरितांच मागण्याचा अर्ज केला आहे. स्थानिक चौकशी होऊन काम परत गेलें आहे. अद्याप निकाल लागला नाहीं. तगादा सुरू आहे.

५ पूर्वीचे ठरावाप्रमाणें लेंडीफुलबागेच्या जमिनीपैकीं कांहीं भागास काटेरी तारेचें कुंपण केलें आहे.

६ या फुलबागेनजीक बायका माणसांकरतां एक पायखाना पूर्वींच बांधला आहे. परंतु विशेषेंकरून उत्सव दिवसांत हा पायखाना अपुरा पडत असल्या ुळें आणखी दोन पायखाने बांधावे म्हणून पूर्वी ठराव झाल्याप्रमाणें तालुक्याचे मामलेदार साहेबांकडे परवानगी मागण्याचा अर्ज केला आहे. अद्याप अर्जाचा निकाल लागला नाहीं. तजवीज सुरू आहे.

७ पूर्वीच्या ठरावाप्रमाणें मशिदींत ठेवलेल्या महाराजांच्या चर्म-पादुका सुरक्षित राहण्याकरितां त्या ठेवण्यास एक कांचेच्या झांकण्याची लांकडी पेटी बनवून त्या पेटींत त्या ठेवण्यांत आल्या आहेत.

८ पूर्वीच्या ठरावाप्रमाणें श्रींचे निस्सीम, एकनिष्ठ व जुने सद्भक्त कै. श्री. नानासाहेब चांदोरकर, श्री. नानासाहेब निमोणकर, श्री. बापुसाहेब बुटी, ी. म्हाळसापती भगत, श्री. बायजाबाई ( तात्या पाटील कोते यांच्या मातु:श्री ) कोते, श्री. काकासाहेब दीक्षित, श्री. आण्णासाहेब दाभोळकर यांच्या तसबिरी श्री. समर्थ मंदिरांत चालू व पुढील पिढीस संस्मरणीय, संतसेवामार्गदर्शक व व्यवहारपरमार्थसाधनादर्शक म्हणून लाविल्या आहेत.

९ या त्रैवार्षिक अहवालाचे अखेरचे सालीं म्हणजे शके १८५१ सालीं या संस्थानावर कै. काकासाहेब दीक्षितांच्या ृत्यूनंतर पहिली महत्तर आपत्ति कोसळली, ती म्हणजे संस्थानच्या खजिनदारीचें चोख, प्रामाणिकपणानें, दक्षतेनें काळजीपूर्वक, काटकसरीनें, मेहनतीनें, निरलसतेनें, द्रव्यद्वारा अगर इतर कोणत्याही प्रकारें मोबदला न घेतां, महाराज समाधिस्थ झाल्यानंतर संस्थान कमिटी स्थापन समारंभापासून सतत १०--

११ वर्षे, रात्रंदिवस काम करणाऱ्या, परमपूज्य व परमभक्त अशा महाशय श्रीयुत गोविंद रघुनाथ ऊर्फ आण्णासाहेब दाभोळकर, पेन्शनर रेसिडेन्ट मॅजिस्ट्रेट फर्स्टक्लास वांद्रियांचा मिति आषाढ शुद्ध ९ शके १८५१, तारीख १५ माहे जुलई १९२९ सोमवारीं तिसरे प्रहरीं वांद्रें येथें त्यांच्याच घरीं झालेला आकस्मित मृत्युही होय.

आण्णासाहेबांच्या निधनाबद्दल, त्यांच्या शिरडी संस्थानच्या अलौकिक सेवेबद्दल, व त्यांच्या प्रासादिक श्री. सांई सच्चरित लेखनाबद्दल बराचसा मजकूर श्री सांईलीला मासिक वर्ष ६, अंक ३ व अंक ६--७ यांत व वर्ष ७, अंक ५, ६, ७, ८ व ९, १०, ११. यांत आला आहे.

त्यांच्या निधनामुळें श्री बाबांच्या निस्सीम, एकनिष्ठ व स्वार्थत्यागी भक्तमंडळींतील परम उत्साही, सदानंदी, आशावादी, व अनुभवी असे एक सद्भक्त नाहींसे झाले व त्या योगें या संस्थानचें कल्पनातीत नुकसान झालें आहे. शिरडी संस्थान मंडळ स्थापन झाल्यापासून ते या संस्थानचे खजिनदार होते हें वर लिहिलेंच आहे. तेव्हांपासून त्यांनीं तें काम हौसेनें, आनंदानें व कुशलतेनें आपले आयुष्यांतील अंतिम क्षणापर्यंत नितांत समाधानकारकपणानें केलें. त्यांची जागा भरून निघणें शक्य नाहीं. शिरडी संस्थान कमिटी तर कांहीं महिने मोठ्या विवंचनेंत होती, परंतु मालिक परमात्मा प्रभु बाबांची लीला अगम्य आहे. त्यांच्या परम कृपेनें त्यांच्याच परम सद्भक्तांपैकीं श्रीयुत रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड प्रख्यात खटाव मकनजी मिल्सचे परमोत्साही, नित्यानंदी, सुस्वभावी सेक्रेटरी, यांचा लाभ होऊन त्यांची त्या जागेवर संस्थान कमिटीनें नेमणुक केली, व बाबासाहेबांनीं कमिटीच्या शब्दास मान देऊन, आपलें काम संभाळून तें काम करण्याचें कबूल केलें, व त्याप्रमाणें ते हल्लीं काम करीत आहेत.

१० याच अहवालाचे त्रैवार्षिक मुदतींत संस्थानावर दुसरी एक आपत्ति कोसळली. ती म्हणजे श्री साईलीला मासिक कांहीं अपरिहार्य

अडचणीमुळें एक वर्षभर बंद राहिलें. त्यामुळें मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या तर कल्पनातीत कमी झालीच. परंतु हें मासिक संस्थानास जी एक प्रकारची उत्पन्नाची बाब म्हणून होतें तेंच संस्थानच्या नुकसानीचें एक कारण होऊन बसलें.

श्री बाबांचे भक्त आर्यावर्तांत थोडयाबहुत प्रमाणांत ठिकठिकाणी पांगलेले आहेत. ते अगणित आहेत. ते सर्व जातींत, सधन निर्धन, ज्ञानी अज्ञानी, स्त्री पुरुष, लहान थोर, विद्वान अविद्वान असे आहेत. आधुनिक संत चक्रवर्ती श्री बाबांच्या संस्थान राजधानींत व दरबारांत नित्यनैमित्तिक कार्यक्रम कसा चालतो, संस्थानची नोकर चाकर मंडळी किती व कोण, त्यांचीं कामें काय, संस्थानचे ट्रस्टी तसेंच कमिटीचे सभासद कोण, किती व ते काय काय कामें करतात, संस्थानची स्थावर जंगम मिळकत कोठें, किती व कोणाचे ताब्यांत आहे, संस्थानचा द्रव्यनिधि किती, कोणाचे ताब्यांत व त्याची व्यवस्था काय, संस्थान पीठांत वार्षिक उत्सव किती व त्यांची, व्यवस्था कोणाकडून होते, संस्थानच्या मिळकतीसंबंधीं तंटाभांडण उत्पन्न झाल्यास, त्याच्या फिर्यादीचें अगर दाव्याचें, वसुलाचें व जमाखर्चाचें काम कोणाकडे असतें, तसेंच श्रीसाई माउलीनें दृश्य स्वरूपांत जे दिव्य व अनंत चमत्कार केले, व अदृश्य स्वरूपांत हल्लींही ती जे पुण्य व असंख्य चमत्कार करीत आहेत व जे भक्तांच्या प्रत्यक्ष अनुभवास आले आहेत, व नित्य येत आहेत त्या अनुभवविनिमयाची व त्याच प्रमाणें इतर जगमान्य, गीर्वाण व मराठी ग्रंथांतील भक्तिज्ञानवैराग्यादि परमार्थ विषयांची माहिती, श्रीसाईमाउलीच्या जवळ व दूरच्या भक्तलेंकरांस मिळण्यास संस्थानच्या मालकीचें किंवा संस्थानतर्फे प्रसिद्ध होणारें श्रीसाईलीलेसारखें एखादें मासिक असल्यावांचून अन्य साधन नाहीं. माणसांवर जशीं संकटें येतात तशीं संस्थेवरही येतात. माणसाप्रमाणें संस्थासही लहान मोठ्या साडेसात्या असतात.

हल्लीं श्रीसाईलीलेचें चालकत्व व व्यवस्था सर्वस्वी श्री. बाबासाहेब तर्खड या विद्वान व वखतशीर काम करणाऱ्या सद्भक्ताकडे आहे. जुन्या

जुन्या पारमार्थिक व वैद्यक कल्पना नवीन शास्त्रीय पद्धतीप्रमाणें जगापुढें मांडण्याची त्यांची हतवटी अपूर्व आहे. "म्हातारा" या नांवाखालीं त्यांचेच लेख श्री सांईलीलेंत हल्लीं प्रसिद्ध होत असतात. भाषा सोपी, विनोदी चटकदार व विद्वत्ताप्रचुर असते. विषय मनन करण्यासारखे असतात.

करितां एक वेळ संतुष्ट असून, मध्यंतरीं एक वर्ष मासिक बंद झाल्यामुळें, त्यावर रुष्ट झालेला श्री सांईलीलेचा वर्गणीदार वर्ग **पुनरपि तिजवर प्रेम ठेवून तिला अंतःकरणपूर्वक उदार आश्रय देऊन तिच्या सर्वसामान्य दोषांकडे न पाहतां** गुणैकदृष्टीनें तिजकडून पूर्ववत् सेवा घेत जाईल व त्या योगें बाबांचीही सेवा करीत राहील व संस्थान निधीस थोडा फार हातभार लावील अशी संस्थान कमिटीस बळकट आशा आहे.

११ त्रैवार्षिक उत्पन्नाच्या आंकडयाची तुलना व कमी जास्तीचीं कारणें:—

| बाब | शके १८४९ | | | शके १८५० | | | शके १८५१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. |
| मासिक वर्गणी | ५७२ | १२ | ० | २६८ | १४ | ६ | ९२ | ७ | ९ |
| वार्षिक वर्गणी | ८१९ | १ | ० | ५४३ | ० | ० | ३२३ | ० | ८ |
| पेटयांचें उत्पन्न | ८८३ | ० | ३ | ७५८ | ० | ९ | ६८७ | २ | ० |
| कायम फंड | ५५१८ | १५ | ३ | १९८४ | ५ | ५ | ६५७ | १३ | ९ |
| कोठी | १७१ | ५ | ६ | १६०६ | ११ | ० | ३४४ | १ | ४ |
| व्याज | ६७८ | ० | ७ | १०४७ | १४ | ० | १८०४ | १३ | १ |
| खर्च वजाजातां साल अखेर कायम शिलक | २५४३८ | ५ | ७ | २७७९२ | १४ | ६ | ३०१५३ | ७ | ७ |

वरील आंकड्यांवरून पाहातां मासिक व वार्षिक वर्गणीस सालो-साल जास्त जास्तच ओहटी लागली असून त्या पुढील कांहीं वर्षांत अजिबात सुकून जातील की, काय अशी भीति वाटते. ओहटी लागण्याचें कारण मासिक व वार्षिक वर्गणीदार भक्तांस या वर्गणीचा तगादा केला जात नाहीं अगर त्याची स्मृति दिली जात नाहीं असें नाहीं, तर त्यांपैकीं कांहीं काल-वश झाले, कांहीं पेन्शनींत गेले, व कांहींचीं सांपत्तिक स्थिति नीट नाहीं, कांहींची, ही वर्गणी अप्रदेय आहे. ही भावना इतर अपरिहार्य अडचणी-मुळें शिथिल झाली आहे. व कांहींच्या वारसांत व नातेवाईकांत ती भाव-नाच लुप्त झाली आहे.

ही जुने भक्तांची स्थिति झाली. नवीन भक्तांत मासिक व वार्षिक वर्गणी देणारे फारसे नाहींत. व जे थोडेसे आहेत ते वखतशीर वर्गणी पाठवीत नाहींत.

पेटया दोन आहेत, एक ंदिरांत व एक मशिदींत. त्यांतील उत्पन्नही रोडावत चाललें आहे. दररोजची १ रुपया दक्षणा या प्रमाणे मंदिराचे पेटींत वर्षाचे ३६० रुपये संस्थानचे असतात. चारही उत्सवांचें दिवसांतील पेटयांचें उत्पन्न उत्सव व्यवस्थापकाकडे जातें. ह्या रकमा वजा केल्या म्हणजे पेटयांचें उत्पन्न सालींना अजमासें रु. ३०० च पडलें. कदाचित् कोणी अशी शंका घेतील कीं, जवळच थोड्या अंतरावर दुसरी अशीच एक पारमार्थिक संस्था असल्यामुळें भक्तसमुदाय अदृश्य संतापेक्षां दृश्य संताच्या दर्शनाकडे जास्त झुकतो. परंतु माझी अशी पूर्ण खात्री आहे कीं, श्री बाबांच्या भक्तवृंदापैकीं जरी कांहीं भक्त इतर संतांचे दर्शनास गेले तरी ते मूळ पीठास कालत्रयीं विसरणार नाहींत व त्यावरचें आपलें आत्यंतिक प्रेम यत्किंचित्ही ढळूं देणार नाहींत. मात्र भक्तांच्या उतरण्याच्या व खाण्यापिण्याच्या सोई येथें नीट झाल्या पाहिजेत.

व पेट्या उघडण्यांचे नियमांत कांहीं तरी दुरुस्ती करून हल्लीं पेक्षां त्यावर जास्त नियंत्रण व देखरेख ठेविली पाहिजे.

कायम फंड व कोठी यांचेंही उत्पन्न दिवसेंदिवस कमी कमी होत चाललें आहे. या त्रैवार्षिक आहवालाचें मुदतींत संस्थानावर बऱ्याच अकल्पित आपत्ति आल्यामुळें संस्थान कमिटीस वरील बाबींकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे तितकें देतां आलें नाहीं.

फक्त व्याजाचें उत्पन्न व सालोसालची कायम शिल्लक थोडथोडी वाढत आहे. तथापि ही वाढ मुंगीचे पायानें शैलशिखर गांठण्यासारखी आहे. शिवाय शके १८५१ सालचा व्याजाचा आंकडा जो फुगीर दिसत आहे त्याचें कारण ४--५ वर्षांपूर्वीं अजमासें ७००० रुपयांची जी रक्कम पोस्टल कॅश सर्टिफिकिटें विकत घेण्यांत खर्च केली होती, त्या कॅश सर्टिफिकिटांपैकीं बहुतेकांची मुदत पुरी झाली असल्यामुळें ती रक्कम व्याजासह परत घेतली. त्या सर्व कॅश सर्टिफिकिटांवरील व्याज या वर्षी मिळालें. वास्तवीक पाहातां हल्लीं सरकारी प्रामिसरी नोटांच्या रूपांत इंपीरियल बॅंकेंत असलेल्या संस्थान शिलकेवर व्याज अजमासें रु. १४०० मिळालें. व संस्थानचा वार्षिक खर्च अजमासें २००० रुपयांपर्यंत होतो. हा खर्च फारच कसोशीनें व काटकसरीनें केला जातो. व्याजाचें उत्पन्न व इतर वरील बाबींचें उत्पन्न मिळून जेमतेम वार्षिक खर्चाची तोंडमिळवणी होते.

१२ याच मुदतींत संस्थान कमिटीपुढें दत्त म्हणून उभी राहिलेली तिसरी अडचण म्हणजे श्रीयुत गोविंद काशीनाथ ऊर्फ अप्पासाहेब गाडगीळ बॅरिस्टर यांनीं आपल्या संस्थान सेक्रेटरीच्या जागेचा राजिनामा दिला ही होय. त्यांच्या या राजिनाम्यामुळें संस्थान कमिटीस दिलगिरी वाटते. अप्पासाहेब हे सुस्वभावी, खुल्या दिलाचे,

मोकळ्या मनाचे, हुशार, निर्भीड कायदेपंडित असून श्री बाबांचे परमभक्त आहेत. त्यांनीं जरी सेक्रेटरीच्या जागेचा राजिनामा दिला तरी ते संस्थान कमिटींचे सभासद आहेत. व जोंपर्यंत ते बाबांचे भक्त आहेत तोंपर्यंत ते संस्थानास जरूर त्या प्रसंगीं योग्य, पोक्त व अधिकारयुक्त वाणीनें कायद्याची सल्ला देण्यास कधींही चुकणार नाहींत असा कमिटीस दृढ विश्वास आहे. हल्लीं त्यांचे जागीं श्रीयुत सुंदरराव दिनानाथ नवलकर हे काम करीत आहेत. हेही बाबांचे परम भक्त असून श्रीमान, उत्साही आनंदी व उत्तम कार्यकर्ते आहेत.

१३ श्रीयुत अप्पासाहेब गाडगीळ पुणें येथें रहात असल्यामुळें त्यांना संस्थानच्या कामकाजाकरितां एक निराळें स्वतंत्र ऑफिस उघडून त्याचा खर्च संस्थान कमिटीस करावा लागत असे. हल्लीं श्री. नवलकर हे मुंबईस रहात असून संस्थानचे खजिनदार श्री बाबासाहेब तर्खड हेही मुंबईस काम करीत असल्यामुळें उभयतांच्या भेटी वाटेल त्या वेळीं होऊं शकतात. त्यामुळें कामाचा निकाल ताबडतोब होऊन पत्रव्यवहार मुळींच करावा लागत नाहीं. पुण्याचें आफिस बंद झालें व नवलकर यांना निराळें आफिस ठेवण्याची जरूरच भासत नाहीं, त्यामुळें ही एक वार्षिक खर्चाची बाब कमी झाली.

१४ शके १८५१ साल अखेर संस्थानच्या द्रव्यनिधि शिलकेची जी ३०१५३-७-१० रुपयांची रक्कम सोबतचे त्रैवार्षिक अहवालांत व वरील ११ वे परिच्छेदांत दाखविली आहे त्यापैकीं फक्त रु. १७५-३-९ रक्कम खजिनदार यांचे हातीं खर्चासाठीं ठेवून बाकीची रक्कम सरकारी प्रॉमिसरी नोटींत व इंपीरियल सेव्हिंग्ज बँकेंत ठेविली आहे हेहीं त्याच अहवालावरून नजरेस येईल.

१५ संस्थानांत वार्षिक असे मुख्य चार उत्सव होतात. एक रामनवमी, दुसरा गुरु पौर्णिमा, तिसरा गोकुळ अष्टमी व चवथा पुण्यतिथि.

पहिल्या उत्सवाची सर्व व्यवस्था श्री दासगणू महाराज यांजकडून होते. दुसऱ्याची सर्व व्यवस्था नागपूरनिवासी श्रीमंत भय्यासाहेब बुटी यांचेकडून होते. तिसऱ्याची व्यवस्था श्रीयुत तात्या पाटील कोते-प्रभृति सर्व शिरडीचे गांवकरी मंडळीकडून होते. व चवथ्याची व्यवस्था शिरडी संस्थान कमिटीकडून होते. वरील चारही उत्सवांपैकीं श्री गोकुळअष्टमीचा उत्सव खेरीजकरून बाकीच्या तिन्ही उत्सवांची सविस्तर माहिती जमाखर्च व अहवालासह सालोसाल त्या त्या उत्सवाचे व्यवस्थापकांकडून श्री सांईलीलेंत प्रसिद्ध होत असते. उत्सव सुरू झाल्यापासून कोणत्याही उत्सवाच्या कार्यक्रमांत आज पावेतों म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं.

१६ कै. भक्तश्रेष्ठ दामोदर घनश्याम बाबरे ऊर्फ अण्णाचिंचणीकर यांनीं आपल्या चिंचणीं, नेवाळें व वेढें येथें असलेल्या सर्व स्थावरजंगम मिळकतीचें वार्षिक उत्पन्न कांहीं अटींवर श्री बाबांचे चरणीं अर्पण करून तें उत्पन्न शिरडी संस्थानच्या व्यवस्थापकांकडे, सदर मिळकतीवर असलेल्या कर्जाचा निकाल लागल्यावर पाठविण्याची तजवीज त्यांनीं नेमलेल्या ट्रस्टीमार्फत केली आहे. सदर मिळकत ट्रस्टीचे ताब्यांत सन १९२३ सालीं आली. मिळकतीवर कर्ज अजमासें रु. १०००० होतें. मिळकतीचें वार्षिक उत्पन्न अजमासें रु. ८०० व सरकार देणें रु. ११६ आहे. याबद्दल सविस्तर हकीकत श्रीसांईलीलेच्या ६ वे वर्षाच्या ८, ९, १० या जोड अंकांत व सातवे वर्षाच्या ९, १०, ११ या जोड अंकांत पूर्वींच प्रसिद्ध झाली आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, अण्णांचे ट्रस्टींनीं मिळकतीचा ताबा घेतल्यापासून आजतागाईत ते सावकारांचीं कर्जें फेडीत बसले आहेत. अशा स्थितींत मृत्युपत्राच्या अटींसंबंधीं ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत काम चालून हल्लीं तेंच काम मुंबई हायकोर्टांत शेवटच्या निकाला-

करितां गेलें आहे. श्रीबाबांच्या इच्छेनुरूप त्या कामाचा निकाल काय लागणें असेल तो लागेलच. परंतु कोर्टाची पायरी चढणें म्हणजे प्रथम खर्चा-साठीं पैशाची भली भक्कम थैली तयार करून ठेवणें होय. वार्षिक उत्पन्न व हल्लीं शिल्लक असलेले व्याज मुदल कर्जाची रकम व दोन्ही कोर्टांचा खर्च यांचा मेळ पाहातां मिळकत कर्जमुक्त होण्यास, व नंतर या मिळक-तीचें वार्षिक उत्पन्न अगर त्याचा भाग महाराजांच्या समाधिसेवेकडे सेवेकडे मिळण्यास किती काळ लोटेल हें सांगवत नाहीं. तथापि जें होतें तें बऱ्याकरितां होतें हें संत वचन लक्षांत ठेवून अण्णांचे ट्रस्टी श्री बाबांच्या पुण्य चरणांचें स्मरण करून व त्यांच्यावर दृढविश्वास ठेवून आपलें कर्तव्य बजावात आहेत. यश ेणार श्री बाबा समर्थ आहेत.

१७ श्रीचे मंदिरापुढील सभामंडपाकरितां सुमारें २ वर्षांपूर्वी एका सद्भक्तानें संस्थान खजिनदारांकडे रु. ५२५ पाठविले आहेत. हल्लींच्या मंदिरांतील सभामंडप अतिशय आकुंचित आहे. म्हणून नवीन सभामंडप बांधण्याची बलवत्तर इच्छा संस्थान कमिटीच्या मनांत फार दिव-सांपासून आहे. सभामंडप बांधणें तो मंदिरास शोभेल असा भव्य व दगडी असून मंदिरापासून मशिदीपर्यंत लांबीचा पाहिजे. मंदीर व मशीद यांचे दरम्यान इतर इसमांचीं ३ जुनीं खासगी घरें आहेत. त्यांपैकीं संस्थान कमिटीनें सुमारें २ वर्षांपूर्वी एक विकत घेतलें आहे, व दुसरीं दोन घेणें आहेत. सभामंडपास खर्च कमीत कमी २५–३० हजार रुपये येईल. श्रीसाईमाउलीचे मनांत आल्यास ती आपल्या धनिक भक्तांपैकीं वाटेल त्या भक्तास प्रेरणा करून हेंही काम क्षण न लागतां करून घेईल. तथापि संस्थान कमिटीनें याकरितां कसून प्रयत्न करावा हें युक्त आहे. सभामंडपाकरितां रु. ५२५ देणाऱ्या सदभक्ताची कमिटी अत्यंत आभारी आहे.

१८ श्री बाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याकरतां येणाऱ्या गरीब, दुबळे, फकीर, गोसांवी, भणंग भिकारी, अतिथअभ्यागत व इतर कोणीही चांगल्या अगर मध्यम स्थितींतील गृहस्थ अशाकरितां शिरडी येथें अन्नछत्राची सोय पाहिजे आहे. हल्लीं तेथें समाधिदर्शनाकरितां आलेल्या भक्तांची सोय लावण्याकरतां माळी बोवा म्हणून एक लिंगायत क्षत्रिय ठेविले आहेत. तथापि या कार्याकरितां संस्थान कमिटीकडून स्वतंत्र अशी रक्कम खर्चाकरितां मंजूर झाली नसल्याकारणानें दर्शनास आल्यागेल्याची सोय जितकी समाधानकारक व्हावयास पाहिजे तितकी होत नाहीं हें खरें. पण ही गैरसोय लवकरच दूर करण्याची खटपट चालू आहे.

१९ तसेंच ही संस्था केवळ धार्मिक व पारमार्थिक स्वरूपाची जरी आहे तरी तिनें जनतेस व भक्तांस आस्ते आस्ते व्यवहार शिक्षण देऊन जेणेंकरून त्यांचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधेल अशा प्रकारची ती एक नमुनेदार संस्था बनली पाहिजे. परंतु हे सर्व विचार द्रव्याभावीं निष्फळ होत. करितां वरील गैरसोई दूर करून उच्च विचारास मूर्त स्वरूप देण्यास संस्थानचा द्रव्यनिधि एक लक्षावर जाईल अशी खटपट अंतःकरणपूर्वक झाली पाहिजे. द्रव्यनिधि वर्धनाचीं अनेक प्रामाणिक साधनें व पुण्यमार्ग " बाबांचे बाळ " यांनीं वेळोवेळीं श्रीसांईलीलेंत पूर्वी सुचविले आहेत. त्यांपैकीं ज्यांस जें साधन अगर जो मार्ग रुचेल त्याचा त्यांनीं अवलंब करून संस्थान कमिटीनें व सांईभक्तांनीं निरलसपणानें व शुद्ध बुद्धीनें कसून प्रयत्न केल्यास श्रीसांई माउली त्यांचे प्रयत्न यशस्वी केल्यावांचून कधींही राहणार नाहीं, असा पूर्ण भरंवसा आहे. शेवटीं

## पृथ्वीवृत्त.

कुसंगति सदा टळो, कुमति सर्वथा मावळो ।
कुभाव मनिंचा पळो, कुटिल कल्पनाही जळो ।
अहंकृति क्षणीं गळो, मन चिदात्मतत्वीं मिळो ।
नती रतिहि ना चळो, तवपदीं न सेवा ढळो ॥

अशी संतावतंस दयोदधि करुणाघन ज्ञानमूर्ति श्रीसमर्थ सद्गु[illegible] बाबांचे चरणकुशेशयीं विनयपूर्ण प्रार्थना करून हा त्रैवार्षिक अहवाल संपवितों.

श्रीक्षेत्र शैलधी ऊर्फ शिरडी
आश्विन शु. १० शके १८५२
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**
संतचरणरज दासानुदास

**सुंदरराव दीनानाथ नवलक[illegible]**
चिटणीस
श्रीशिरडी संस्थान कमिटी.

# फिरोजशहा होर्मसजी पदमजी यांचा अनुभव.

सन १९१७ सालीं मुंबईचे मिस्टर आणि मिसेस् होर्मसजी पदमजी हीं दोघें शिरडीस श्रीसाईबाबांचें दर्शन घेऊन तेथून बाबांचा फोटो घेऊन घरीं आलीं. घरीं आल्यानंतर त्यांचा मुलगा फिरोजशहा त्या वेळी शाळेंत जाणारा विद्यार्थी होता. तो त्यांना म्हणाला कीं, असे साधु पुष्कळ असतात, त्यांत खरेखोटे कसे ओळखावयाचे ? असें म्हणून तो आपल्या खोलींत झोंपावयास गेला.

झोंपण्यापूर्वीं तो साईबाबांविषयीं आपल्या आईबापांच्या उद्गारांविषयीं विचार करीत पडला व मनांत म्हणाला कीं, तुम्ही खरे संत असाल तर मला कांहीं तरी खात्री होईल असा दृष्टांत द्या. असें मनांत आणून तो निद्रावश झाला. त्याला स्वप्नांत बाबांनीं दर्शन देऊन सांगितलें कीं, मी खरा कीं खोटा याची तुला खात्री पाहिजे तर उद्यां सकाळीं माझा फोटो टेबलावर तुझ्या वडिलांनीं ठेवला आहे तो तूं उचलून पाहा. जर तो तूं उचललास तर मी खोटा आहे असें समज, न उचलूं शकलास तर खरा आहें असें समज. असें स्वप्नांत पाहून तो जागा झाला, आणि त्यानंतर बाकी राहिलेली रात्र तळमळ करीत सकाळ केव्हां होते याची वाट पाहात राहिला होता.

सकाळीं उठल्यावर तो फोटो उचलण्यास गेला, तव्हां त्याला फोटो फार जड वाटला, आणि जोरानें यत्न करूं लागला तेव्हां सर्व टेबल उचललें गेलें, परंतु निव्वळ फोटो तो उचलूं शकला नाहीं. तेव्हांपासून बाबांवर त्याची पूर्ण श्रद्धा बसली.

कांहीं दिवसांनंतर त्याला बाबांनीं स्वप्नांत सांगितलें कीं, तूं इतके दिवस वडिलांच्या पेपर मिलमध्यें काम करीत आहेस, तर तुला आतां पगार मिळूं लागेल. दुसऱ्याच दिवशीं त्याच्या चुलत्यानें त्याला विचारिलें कीं, " फिरोजशहा, तूं इतके दिवस मिलमध्यें काम करतोस तर तुला काय

मिळतें ! " तो म्हणाला " कांहीं नाहीं. " तेव्हां चुलता म्हणाला " मी तुझ्या बापाला सांगून तुला दरमहा २०० रुपये करवितों. " आणि त्या प्रमाणें फिरोजशहाला दरमहा २०० रुपये मिळूं लागले.

पुढें कांहीं वेळानंतर फिरोजशहा तापानें आजारी पडला. डॉक्टरने बरेच उपाय केले; पण कांहीं फरक पडला नाहीं. एके रात्रीं फिरोजशहाला स्वप्नांत असें दिसलें कीं, साईबाबांनीं त्याला उचलून शिरडींत नेलें आणि मशिदींत टाकून त्याच्या सर्व अंगावर राख ( उदी ) घासली. त्यामुळें त्याला फार घाम सुटला.हें रात्रीचें स्वप्न. सकाळीं डॉक्टर आल्यावर त्याला तपासतां डॉक्टर फारच चकित झाला. आणि म्हणाला कीं, काल तर याची फारच गंभीर स्थिति होती व आतां हा इतका सुधारला कसा ? त्यावेळे-पासून फिरोजशहाचें दुखणें हलकावलें व थोडया दिवसांनीं तो साफ बरा झाला.

वरील सर्व दृष्टांतामुळें जरी फिरोजशाहला बाबांचें साक्षात् दर्शन घडलेलें नव्हतें तरी तो त्यांच्या फोटोची फारच आदरपूर्वक उपासना करीत असे व आहे. त्याच्या मनांत शिरडींत बाबांची कशी काय व्यवस्था आहे हें आपणांस कोण खात्रीपूर्वक सांगेल त्या चौकशींत असतां त्यानें घोडबंदर रोडवरून मोटरनें जातांना " साईबाबा लेन " हें नांव वाचलें. मोटर तर झटकन् घरीं निघून गेली. त्या " साईबाबालेन " मध्यें आप-णांस बाबांची खरी हल्लींची माहिती मिळेल असा विचार करून तो ता. १५।३।३१ रोजीं साई प्रधानबागेंत आला आणि जी बातमी त्याला इतके दिवस पाहिजे होती ती त्याला त्याच्या मनाप्रमाणें मिळाली.

वरील हकीकत रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं आज रोजीं सांगितली ती जशीच्या तशीच त्यांच्याच शब्दांत प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

वांद्रें, ता. २२ मार्च १९३१.

**रा. आ. तर्खड.**
संपादक
श्री साईलीला

THE

# KEKAVALI.

OR THE

## 'CRIES OF THE PEACOCK.'

A POEM, OF THE CELEBRATED MARATHI POET

**MOROPANT OF BARAMATI**

EDITED

WITH A COPIOUS AND CONTINUOUS COMMENTARY,
ANNOTATIONS, AND ILLUSTRATIONS.


**RAO BAHADUR**

**DADOBA PANDURANG, J. P.**

AUTHOR OF A MARATHI GRAMMAR, ATLAS ETC, LATE SUPERINTENDENT OF THE GOVERNMENT SCHOOLS IN THE DAKHAN, MEMBER OF THE B. B. ROYAL ASIATIC SOCIETY, AND FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY.


---


1931.

**Price Rs. 2.**

TO THE MEMORY

OF MY BELOVED DAUGHTER

KAVERI BAI,

WITH PARENTAL AFFECTION AND LOVE,

IS INSCRIBED

THE FOLLOWING WORK, WHICH WAS FIRST UNDERTAKEN FOR HER INSTRUCTION, BUT WHICH SHE WAS NOT SPARED TO SEE FINISHED.

# INTRODUCTION.

It is a source of great pleasure to me to introduce to the notice of the European Oriental scholars, whose indefatigable labours in laying open the mines of the Learning and the far-famed Wisdom of the East, are worthy of the first nation of the earth, the following little poem of the celebrated Marathi poet Moropant of Baramati, entitled the 'Kekawali' or the 'Cries of the Peacock';* which, from its pure and sublime direction, and the music of its rhymes and alliterations, for which our poet is peculiarly distinguished from a host of other poets of the Maharashtra, has obtained nearly the same renown as the "Paradise Lost" and the "Paradise Regained" of the immortal Milton in England.

Moropant is said to have been born in the year 1729 A. D. and to have died in 1794. His father Ramaji Pant was a member of the Karhada subdivision of the Maharashtra Brahman caste, who first served the Raja of Kolhapur at the fort of Panhala, in the humble capacity of a karkun or clerk, and subsequently Pandurang Row, the then Jahagirdar of Baramati in the same capacity. Our poet, who, in his youth had applied himself to the acquisition of the Sanskrit language and litera-

---

*This epithet is not adopted from any reference to the beauty or display of the peacock, or from the natural peculiarity of its utterance, but from the popular belief, or rather poetical conception, of the Hindus, that the bird has a natural predilection for the dark rainy clouds, which from their bountiful and refreshing nature (cooling the dry and parched surface of the earth, and making it fertile), are supposed to inspire the bird with raptures of delight as apprent from its continuous responses, joyful dance, and fond display of its rich and beautiful plumage, particularly at the commencement of the rainy season. The clouds again are compared to the bounty and benevolence of the Deity. Now the poet imagining himself to be the peacock, as his own name (*Mayura* in Sanskrit and *Mora* in Marathi, a peacock.) suggests, happily calls his prayers and supplications addressed to the Deity, and forming the theme of the present poem, as the Cries or responses of that bird, beseeching the cloude-like bountiful Deity to pour down His mercies upon him.

ture, especially of the classics, gave early proofs of his genius as a poet of no ordinary merit. Considering the high respect in which the knowledge of the Vedas, and Shastras, and of the Sanskrit language in general, was then held at the Court of the Peshwas, the then potentiate Hindu Power in Hindustan, and *a priori* the source of distinction, emoluments, and fame, to the ambition of the Hindu literati throughout India, it redounds no little to his fame, and I should add, to no small liberality of sentiment on the part of our Brahman poet, to have devoted his life to the instruction and enlightment of the mass of his countrymen, through the medium of their own vernacular tongue by opening to them a part of the treasure, or I may better, express it, by serving up to them the intellectual food, already prepared in the Sanskrit language, and thus to have contributed in no small degree to the improvement and cultivation of the Vernacular Literature of his country. Of all the Marathi poets, and it cannot be concealed that poets are the only authors in India, Moropant is perhaps the most voluminious who has left his works behind him in a correct state of preservation. His favourite metre is the *arya*, in which he has rendered nearly the whole of the Mahabharat, and the Bhagavat, as well as given copious Extracts from various other Puranas and Mahatmyas. Besides, he has written short panegyrics on all the modern poets and saints known in the Dakhan. To this mass of writings in the arya metre alone, must be added his one hundred and eight Ramayanas, which are said to be more or less enlarged in form, and composed in a variety of metres, with all the poetical skill which an ingenious mind can conceive and accomplish. Add to this a large number of songs in different stanzas.

From the above statement, it can be easily inferred that the following little poem, which I have edited, and on which I have commented, is but an infinitesimal portion of the great mass of the writings which Moropant has left behind. But though small, this poem—the "Cries of the Peacock," has been selected as one of the best and fairest samples which can testify to the poetical talents of our author. The purity and grandeur of its style, the poetical beauty and music of its rhymes, and above all these the felicity of its theme (being the

praise of the Deity, though in the form of Vishnu and his reputed incarnations) are among its chief recommendation for its present selection. It can hardly be expected that a poem, written in the vernacular by a Sanskrit Pandit of the time of the last Peshwas, in imitation and on the model of the sublimity of the Sanskrit poetry, rich in high words and phrases, will be ever quite intelligible to the populace, and to the generality of students in this country, without a paraphrase and explanation of the original text. Experience has perfectly satisfied me that even among the Sanskrit scholars in this country, few can pretend to the full and easy comprehension of this little poem without mental efforts of no ordinary kind.

I sincerely trust that the work now edited, and copiously commented on, (with numerous annotations and illustrations) will prove a source of such palatable instructions as the people of the old school, who form the bulk of the reading population would, I fancy, heartily relish, and thereby may induce, what is sadly wanted, a taste for reading among them; and that in the hands of the young and aspiring students, it may prove a help also for facilitating the comprehension of the great body of the poetical compositions of Moropant, and other Marathi poets of his standard. A careful study of the work will also, I feel confident, gave the way for the acquisition of the Sanskrit language, a knowledge of which is now rightly, deemed to be an essential part of our University education for the Hindus.

In my preliminary observations which preface this work I have endeavoured to give a short account of the life of our poet, such as I could glean in Bombay, with a rapid sketch of all his principal works, embracing a dissertation on his merit as a poet.

The first and original object which actuated me to take up my pen in writing a commentry on this Marathi poem and that also in the verbose form in which it now appears, was the domestic instruction of my own children, especially that of my most beloved and lamented daughter, Kaveri Bai, the eldest of them all, who had just finished the little course of education available in the Female school established by the

liberality of my influential and most worthy native fellow citizen the Honorable Jagannath Shankershet,* and who was subsequently placed under the tution of my kind and revered friends Dr. and Mrs. Wilson to begin with such a course of instruction as might benefit an English girl of her age and station in life. But her who gave early proofs of great promise and who was the source of great comfort and consolation to her parents, it pleased our Heavenly Father to remove from this world before the work, first undertaken for her instruction, was brought to completion. under the circumstances of this bereavement, which is so closely associated with the prepara- tion of this volume, my parental affection cannot now see a a better and more consolatory course for my afflicted feelings than to dedicate the same though now fit more to be read by the learned of my countrymen than by young school-going people, to the memory of her who was the occasion of its production; particularly when it is to be considered, that in my peculiar position as a Hindu, I cannot even erect a homely tomb over her lamented ashes as a poor symbol of my mournful affection.

Should the present volume, for which no pains have been spared to rendered it acceptable to my native readers, prove instrumental in any way in the advancement of the growth of the indigenous Literature of my country, and thereby give an impetus to the extension and cultivation of a taste for reading among my fellow countrymen, which is still a great desideratum, I shall not consider my labours, however humble, exerted in vain.

Dadoba Pandurang.

*It is with deepest regret that I have to record here the death of this great man, which sad event took place on the 31st July 1865 when this sheet was in the press. The public will no doubt do justice to him in commemoration of his very useful to his career, by the erection of a statue which they voted for him some months ago in the Town Hall. But I cannot avoid paying a humble tribute to his lamented memory by expressing here my deep sense of gratefulness for his particular acts of kindness to me personally ever since I was a student in the Elphinstone Institution.

श्रीमद्रामनंदनमयूरकविरचित

# केकावलि.

## राव बहादुर, दादोबा पांडुरंग

यांनीं

केलेल्या यशोदापांडुरंगी या नांवाच्या विस्तीर्ण टीकेसहित.

### प्रथमावृत्ति

शके १७८५ क्रोधनामसंवत्सरे } { सन १८६५ इसवी

### द्वितीयावृत्ति

शके १८५२ प्रमोदनामसंवत्सरे } { इसवी सन १९३१

---

किंमत रु. २

माझी सुप्रिया आणि सुशीला कन्या

# कावेरीबाई

जिच्या अभ्यासाकरितां म्यां प्रथम या पुढील केकावलि या नांवाच्या
स्तोत्रावर टीका करावयास आरंभ केला, परंतु जी त्या
ग्रंथाची समाप्ति पाहाण्यास जगदीशाच्या
इच्छेनें राहिली नाहीं,

तिचें

**पितृवात्सल्यादिसहस्रसद्गुणस्मारक,**
**आणि परमशोचनीय असून क्षणभर विश्रांतिदायक,**
**असें जें स्मरण**

त्यास,

आतां तोच ग्रंथ म्यां दुहितृवात्सल्याच्या प्रेमानें
अर्पण केला असे.

# प्रस्तावना.

ज्या ज्या देशांत आणि प्रांतांत महाराष्ट्र भाषा चालत आहे, आणि ती लोक समजत आहेत, त्या त्या देशांत मोरोपंतांच्या नांवाप्रमाणें इतर थोड्याच महाराष्ट्र कवींचें नांव प्रसिद्ध असेल. यांस आणखी मयूर कवि असेंही म्हणतात. या कवीचा जितका वृत्तांत या काळीं मिळेल तितका सारा मिळवून संग्रहित करावा, अशी माझी फार इच्छा आहे; परंतु त्याविषयींची सामग्री सध्यां मजजवळ नसल्यामुळें तसें आतांच माझ्यानें करवत नाहीं. सांप्रत इतकेंच माझ्या ऐकण्यांत आहे कीं, कोल्हापूर प्रांतीं पन्हाळा किल्ला प्रसिद्ध आहे, त्या गडावर पूर्वी पेशवाईंत कऱ्हाडे ब्राह्मण जातीचे रामाजीपंत पन्हाळकर या नांवाचे कोणी कारकून होते; त्यांचे मोरोपंत हे चिरंजीव. यांच्या घरीं कारकुनीचा पेशा चालत असतांही मोरोपंतांनीं लहानपणीं काव्यव्युत्पत्ति चांगली संपादन केली. पुढें बारामतींत बाबूजी नायक यांचे पुत्र पांडुरंगराव या नांवाच्या गृहस्थाकडे जहागीर होती. त्यांनीं रामाजीपंतांस आपल्याजवळ बोलाविलें, आणि आपल्या खासगीच्या दफ्तरांत त्यांस कारकुनीची असामी दिली. येथें मोरोपंत हे पन्हाळा किल्ल्यावर आपल्या तीर्थरूपाचें कारकुनीचें काम चालवीत होते. असें असतां एकदां दफ्तरांत दोन आण्याची चूक पडली होती, तिचा मेळ मिळविण्यांत पंतांस आठ दिवस सतत डोळ्यांत काजळ घालून हिशोब तपासावा लागला. हें त्यांचें अल्प वयांत इतकें अव्यवहित लक्ष पाहून त्यांच्या यजमानानें त्यांना विनोदानें म्हटलें—‘ जर तुम्हीं असें लक्ष ईश्वरभजनीं लाविलें असतें तर दोन आण्याच्या ठिकाणीं तो तुम्हांस मिळाला असता.’’ हाच विनोद पंतांनीं उपदेशस्थानी मानून तेथेंच यजमानापुढें कारकुनीची लेखणी ठेविली; आणि पुढें आपल्या तीर्थरूपापाशीं बारामतीस गेले. तेथें पांडुरंगरावांनीं त्यांची काव्यव्युत्पत्ति सुंदर आहे असें पाहून त्यांना प्रथम रामरक्षेचें स्तोत्र अनुष्टुप् छंदांत आहे तें दुसऱ्या छंदांत बाचावयास सांगितलें. पंतांनीं थोडा अवकाश मागून तें स्तोत्र दुसऱ्या छंदांत बांधून आणखी साऱ्या रामायणाचा अर्थही त्यांत संग्रहित केला. हें पाहून पांडुरंगरावांस फार आनंद झाला, आणि त्यांनीं त्या दिवसापासून मोरोपंतांस आपल्या घरचे पुराणिक नेमून त्यांचें व त्यांच्या तीर्थरूपाचें पान आपल्याजवळ वाढण्याची वर्दी दिली. याप्रमाणें पांडुरंगराव मेढजकर यांच्या पदरीं असतां मोरोपंतांनीं त्यांच्या पंक्तीस जेवावें, आणि अहोरात्र आर्या व दुसरीं कवनें रचून प्रथम पाटीवर गेरूनें खरडून ठेवावीं, आणि मग तीं सारीं आपल्या हातानें साफ लिहून ठेवावीं, असा उद्योग आरंभिला. भारतांत पहिल्यानें कर्णपर्व केलें असें सांगतात. याप्रमाणें पुढें हे मोठे कवि झाले. या कवीनें आर्याछंदांत पुष्कळ ग्रंथ लिहिला आहे. सारें अठरा-

पर्वें महाभारत, बारें द्वादशस्कंध भागवत, याशिवाय पुष्कळ लहान लहान स्तोत्रें, माहात्म्यें, आणि संतचरित्रें, हे सर्व ग्रंथ मोरोपंतांनीं आर्याछंदानें महाराष्ट्र भाषेंत रचिले आहेत. याशिवाय हे कविराज रामोपासक होते; या कारणानें यांची रामचरित्रावर नैसर्गिक भक्ति असल्यानें यांनीं आर्येंत व इतर छंदांत मिळून एकशें आठ रामायणें रचिलीं आहेत, अशी लोकांत प्रसिद्ध वदंता आहे.[1] त्यो आपल्या महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत या कविविषयीं सूचनार्थ असें लिहिलें आहे कीं,—" अलीकडेस पेशवाईंत बारामतीकर पांडुरंगराव यांच्या पदरीं मोरोपंत या नांवाचे कारकून होते, पुढें त्यांची काव्यव्युत्पत्ति सर्वोत्कृष्ट पाहून त्यांस पांडुरंगरावांनीं आपल्या घरचे पुराणिक केलें; त्यांनीं तर आपल्या रसभरित काव्यानें या भाषेस केवळ संस्कृत भाषेचीच प्रौढी आणिली. वामन आणि मोरोपंत यांना अनुक्रमें महाराष्ट्र भाषेचे व्यास व श्रीहर्ष म्हटल्यासही साजेल. प्राकृत भाषेविषयीं नाक मुरडणारे जे शास्त्री व पंडित यांना यांनींच लाजविलें. आजपावेतों जें कांहीं भांडार संस्कृतभाषारूप पेटींत कुलुप घालून ठेविलें होतें, आणि तिची किल्ली ब्राह्मणांच्याच स्वाधीन होती, तें ज्ञानेश्वर, एकनाथ, मध्वनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत आदिकरून जे ब्राह्मण कवि झाले त्यांनीं उघडून काढून, त्याचें प्राकृत लेणें करून, सर्व लोकांस अर्पण केलें; म्हणून नुसतें यांचें कौशल्य व चातुर्य वर्णावें इतकेंच नाहीं, परंतु यांची औदार्यपूर्वक जी औपकारिक बुद्धि तिचीहि या प्रसंगीं प्रशंसा केली पाहिजे." यांत त्यो मोरोपंत

---

१ अलीकडे सुमारें तीन वर्षांपासून राजश्री माधवराव चंद्रोबा या गृहस्थांनीं सर्वसंग्रह या नांवानें प्रति महिन्यास एक ९६ पृष्ठांचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्याची योजना केली आहे; त्यांत बहुधा प्रसिद्ध महाराष्ट्र कवींनीं केलेले सर्व उपलब्ध ग्रंथ क्रमशः छापून प्रसिद्ध करावे असा परमश्लाघ्य उद्योग चालविला आहे. या सर्वसंग्रहांत आपल्या मोरोपंत कवींच्या सर्व कृतींचा संग्रह होईल असा भरंवसा आहे. त्यांत या कवीचीं आर्याछंदांत रचिलेलीं महाभारताचीं आदिपर्वांपासून स्वर्गारोहणपर्वांपर्यंत १८ पर्वें छापून बाहेर निघालीं आहेत. या सर्वसंग्रहांत मोरोपंतकृत रामायणेंही छापून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम चालविला आहे. त्यांत सांप्रत मीं ही प्रस्तावना लिहितों त्या काळापर्यंत १५ रामायणें समाप्त होऊन बाहेर निघालीं आहेत; व त्यांत स्तोत्ररामायणाचे १० भेद आहेत ते जर आंत घेतले तर एकंदर सध्यां २४ रामायणें छापून बाहेर निघालीं आहेत असें समजलें पाहिजे.

या रामायणांचीं नांवें:–१ मात्रारामायण. २ मंत्र रा० ३ नामांक रा० ४ पर्व रा० ५ तीर्थ रा० ६ ऋषि रा० ७ स्तोत्र रा० ८ उमा रा० ९ लघु रा० १० विद्न्माला रा० ११ मंत्रगर्भसाकी रा० १२ मनाक्षरी रा० १३ पृथ्वीछंद रा० १४ ... राज रा० १५ विबुधप्रिय रामायण.

कवीची श्रीहर्षाशीं प्रशंसा केली आहे ती किती समंजस व योग्य आहे हें, या कवीचें सारें काव्य साद्यंत लक्षपूर्वक पर्यालोचनांत आणिलें असतां त्यांनीं येईलच, परंतु माझ्या बुद्धीस असें वाटतें कीं, हा पुढला त्यांचा लहानसा स्तोत्ररूप ग्रंथ, ज्याच्यावर त्यां बालबोधार्थ टीका केली आहे, त्याच्या काव्यसरणीचें मनन केलें असतांही ध्यानांत आल्यावांचून राहाणार नाहीं. कालिदास, भवभूति, माघ, आणि श्रीहर्ष, यांचीं अनुक्रमें रघुवंशकिरातादि जीं प्रसिद्ध सहा काव्यें आहेत, त्यांमध्यें शब्दांच्या काठिन्यावरून आणि अर्थान्वयाच्या मूढत्वावरून श्रीहर्षाचें जें शेवटलें नैषध काव्य, त्याचें दुर्बोधत्व बहुधा लोकानुभूत आहे; तसेंच ज्यांना संस्कृत भाषा अवगत नाहीं, अशा प्राकृतजनांस मोरोपंतांच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्यानें सहाजिक त्या शब्दांच्या अपरिचयामुळें, आणि प्राकृतजनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द, आणि निव्वळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृतभाषाभिज्ञ अशा पंडितांसही त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवामुळें, तसेंच समयविशेषीं शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दुःसाध्यत्वामुळें, मोरोपंतांचें काव्यही दुर्बोध आणि कठिण म्हणून बहुधा सर्व जनांस अनुभूत आहे.

ज्या काळीं छापखाने व टपालें यांचें या देशांत नांवही नव्हतें, त्या काळीं मोरोपंत जिवंत असतां त्यांच्या काव्यकर्तृत्वाची प्रसिद्धि काशीपर्यंत लांवली होती, आणि ते निवर्तल्यास अद्यापि शंभर वर्षें झालीं नाहींत इतक्यांत या देशांत जगप्रसिद्ध कवि म्हणून त्यांची कीर्ति पसरून गेली आहे. याचीं कारणें पाहातां या देशांत हरिदासांची कीर्तन करण्याची जी वृत्ति चालत आली आहे ती या कारणांत एक मुख्य कारण होय, असें मला दिसतें. तसें आणखी या वृत्तीस मोरोपंतांच्या कृतीनेंही फार उत्तेजन दिलें; तें असें कीं,–मराठ्यांचें राज्य स्थापित झाल्यापासून आणि त्यांत विशेषेंकरून पेशवाईच्या कारकीर्दींत त्या राज्याचा अभ्युदय झाल्यापासून, ब्राह्मण लोकांमध्यें वेदविद्या आणि शास्त्रविद्या यांच्या बलावर ज्या वृत्ती चालत होत्या त्यांस मोठें उत्तेजन मिळालें; तथापि त्या उत्कर्षापूर्वी आणि त्या उत्कर्षाच्या वेळीं हरिदासांची जी या देशांत वृत्ति चालत होती, ती बहुधा नामदेव, तुकाराम यांचे अभंग; ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, आणि श्रीधर यांच्या ओंव्या; एकनाथ, मध्वनाथ आदिकरून साधू कवींचीं पदें; अमृतरायाचीं पदें आणि कटिबंध; कबीराचे दोहरे व कवितें; आणि वामन पंडिताचे श्लोक; यांचीं बहादें मुखपाठ करून आणि त्यांत व्युत्पन्न हरिदास असल्यास थोडी काव्युत्पत्ति साध्य करून, त्यांच्या साहाय्यानें चालत होती; म्हणून सभेंत विद्वज्जनसमाजांत हे हरिदास कितीही वक्ते आणि सरस कीर्तन करणारे असले, तथापि दक्षणेच्या बहुमानांत या गरीबांची कोटी चौथी असे; म्हणजे प्रथम वैदिक, दुसरे शास्त्री, तिसरे पुराणिक

आणि चौथे हरिदास अथवा गोसावी. परंतु ही वृत्ति बहुधा भगवद्भक्तीच्या बळा-वर आणि प्राकृत कवितांच्या साहाय्यामुळें चालत होती, म्हणून शूद्र अंत्यजांसही या वृत्तींत शिरण्यास कोणी प्रतिबंध केला नाहीं. हरिकीर्तन हें मुक्तद्वार समजून कोणत्याही जातीस या वृत्तींत शिरण्याचा प्रतिबंध ब्राह्मणांच्यानेंही कर-विला नाहीं. ब्राह्मण, शूद्र, अंत्यज आणि शेवटीं मुसलमानही, विठोबाचे भक्त

---

१ महा भक्त रामोपासक कबीर हे मोमीन जातीचे मुसलमान होते, हें तर सर्वांस माहीत आहे. ताराबाजवर महिपतबावा यांनीं आपल्या भक्तिविजयांत शेख महंमद या नांवाचे दुसरे मुसलमान हरिभक्त यांचें कांहीं चरित्र वर्णिलें आहे; त्यांत असा चमत्कार लिहिला आहे कीं, हे शेख महंमद आपल्या गावीं श्रीगोंद्यांत असतां एकदां यांनीं पुष्कळ मंडळीसमक्ष कथेंत एका हाताच्या तळहातानें दुसऱ्या हाताचें तळ-हात रगडलें; तेव्हां कित्येकांनीं त्यांस पुसलें: आपण हें काय करितां ? त्यांनीं सांगितलें कीं, देहूंत तुकोबा ज्या मंडपांत या समयीं कीर्तन करीत आहेत, त्याला अग्नि लागला आहे तो विझवितों; त्यावरून देहूहून वर्तमान आणवितां तेथें तसें घडून आल्याचें कळलें. इसवी सन १८५७ नांत मी हुजूर डेप्युटी मॅजिस्ट्रेटच्या हुद्यावर असतां प्रजे-कडून हत्यारें घेण्याचें सन १८५७ चें २८ वें ॲक्ट बजावण्याकरितां नगर जिल्ह्यांत पारनेर आणि घोडनदी तालुक्यांत फिरत होतों. तेव्हां श्रीगोंदें म्हणजे ज्याला बहुतकरून लोक चाम्हारगोंदें म्हणतात, त्या गावांत गेलों. तेथें शेख महंमद यांच्या मठांत जाऊन त्यांचे शिष्य सांप्रदायी आहेत त्यांस भेटलों. त्यांनीं शेख महंमदानीं केलेल्या अभंगाची वही मला वाचावयास दिली; ती मीं थोडी वाचली, आणि त्या मुसलमान हरिभक्तांनीं रचलेला 'एक योगसंग्राम' या नांवाचा ग्रंथ होता तोही त्यांनीं मला पाहावयास दिला. तो ग्रंथ ज्ञानेश्वरी एवढा बहुधा मोठा होता. त्या साऱ्या ग्रंथाची प्रत करून घेण्यास मला अवकाश नव्हता म्हणून त्याचे दोन तीन अध्याय वाचले, आणि बाकी चाळून पाहिला. हे शेख महंमद मोठे ज्ञानी पुरुष होते असें त्यांनीं आपल्या मागें टेविलेल्या कृतीवरून दिसतें. लोकांत सत्यज्ञानाचा प्रकाश व्हावा आणि बाहेरील दांभिकाचार मिटावा म्हणून त्यांचें मोठें धोरण होतें. येथें मी वानगीसाठीं त्यांचा एक अभंग लिहितों

ऐसेंकेंयागोंगळें । नाहींसोंवळेंओंवळें ॥ १ ॥
कांटेकेंकतच्याझाडा । आंतजन्मलाकेवडा ॥ २ ॥
फणसाअंगींकंडकांटे । आंतसाखरेचेगोटे ॥ ३ ॥
ऊंससर्वअंगींकाळा । आंतअमृतजिव्हाळा ॥ ४ ॥
नारळवरितोकठाण । आंतसाठवेजीवन ॥ ५ ॥
काळीकस्तूरीदिसती । आंतसुगंधसुटती ॥ ६ ॥
मधमाशांचाघोंगाणी । आंतअमृताचीखाणी ॥ ७ ॥
शेखमहम्मदविलासी । हरिभक्तीचारहिवासी ॥ ८ ॥

होऊन, कपाळीं बुका आणि गळ्यांत तुळशीच्या माळा घालून, यथेष्ट भजनें आणि कथा करूं लागले. त्यांत जो वक्ता आणि रसिक हरिदास असे,-मग तो शूद्र कां असेना,-तो श्रोते मिळवून त्या काळीं लोकांत प्रशंसेस पात्र होत असे. तथापि या वृत्तीस बहुधा प्राकृत कवितांचें साहित्य आणि शूद्रादि नीच वर्णांचा संसर्ग असे, म्हणून ब्रह्मसमाजांत ही वृत्ति जशी बहुमानास योग्य व्हावी तशी झाली नाहीं. कितीहि ब्राह्मणव्यतिरिक्त जातीचा हरिदास रसिक आणि वक्ता असला तथापि त्यास सभेंत तर बहुमान नसेच, परंतु उलटें ही वृत्ति धारण करणाऱ्या ब्राह्मणजातीच्या हरिदासासही सभेंत खालच्या कोटींत जावें लागे. तथापि वक्तृत्व हा लोकांच्या मनाचें रंजन करणारा आणि तसाच प्रेमळ वक्ता असल्यास तो लोकांच्या मनाचें आकर्षणही करणारा गुण होय, म्हणून सर्व प्रकारच्या लोकांत वक्त्या हरिदासाची वाहवा होऊन त्यास सर्वांकडून जशा बिदाग्या होऊन द्रव्य-प्राप्ति होत असे, तशी वैदिक, याज्ञिक आणि शास्त्री यांना होत नसे. त्यांत पेशवाईंत जेव्हां महाराष्ट्र ब्राह्मणजातींत विद्वत्ता वाढत गेली, तेव्हां हरिदासांसही शास्त्री, पंडित अशा विद्वान पुरुषांकडून वाहवा मिळविण्याचें अगत्य पडत गेलें. या कारणास्तव ब्राह्मण जातीच्या हरिदासांस काव्यव्युत्पत्ति व क्वचित् शास्त्रव्युत्पत्तिही वाढविण्याचें अगत्य पडत गेलें. नुसत्या प्राकृत ओव्या, अभंग आणि पदें यांजवर कथा करून शास्त्री, पंडित आणि व्युत्पन्न अशा श्रोत्यांचें मनोरंजन करणें कठीण, म्हणून त्यांच्या भरतीस भागवतांतील श्लोक, सुभाषित श्लोक, चंपु, नाटकें आणि काव्यें, यांतील वेंचे पाठ करून चांगली झणझणीत कथा करून दाखविणें प्राप्त होत गेलें. अशा प्रसंगाच्या अवसरीं मोरोपंतांनीं बारामतींत संस्कृत काव्याशीं तोल घेणाऱ्या अशा आपल्या प्राकृत आर्या बाहेर काढिल्या. तेव्हां अर्थात् अशा हरिदासांच्या द्वारानें त्यांचा प्रसार होण्यास विलंब लागला नाहीं; हेंच मोरोपंतांची कीर्ति ते जिवंत असतांच काशीपर्यंत लांबण्याचें जें कारण म्हणून त्यां सांगितलें तें.

आणखी अशी अटकळ होते कीं, जेव्हां प्रथम मोरोपंतांच्या आर्या बारामतींतून बाहेर निघूं लागल्या, त्या काळींच बारामतीजवळ सोलापुरांत रामजोशी या नांवाचे व्युत्पन्न आणि परम रसिक कवि असून त्यांनीं हरिदासाच्या वृत्तीचें अवलंबन केलें होतें; आणि नुकतेच कीर्तीच्या अंगणांत जाण्यास उमऱ्यावरून बाहेर पाऊल टाकीत होते; तों इतक्यांत त्यांस पंतांच्या कृतिकुमारिकेचा आल्हादजनक शकुन भेटला. तिच्या सौंदर्यानें आणि निमंत्रणरूप आनंदजनक अशा प्रेमकटाक्षानें आकर्षितांतःकरण होऊन ही उपवर कन्या आपण वरावी अशी मनांत आवड धरून त्यांनीं तिच्या पित्याचा शोध करण्याकरितां तिचेंच अनुसरण केलें. पित्यानींही आपल्या कन्येच्या गुणास हा इतका लुब्ध पाहून तिनें याचें पाणिग्रहण केलें असतां ती

ज्यकरच सुखी होईल म्हणून तसें करण्यास आपलें पूर्ण अनुमोदन दिलें. हा प्रसंग कोणी त्याचीं लिहिलेल्या आर्येत असाच वर्णिला आहे.

जैशीजनकेंदिधलीसच्चिखनरामजोसितात्याला ।
वैशीमयुरेंदिधलीतीआर्यारामजोसितात्याला ॥

किंबहुना असेंही ऐकण्यांत आहे कीं, मोरोपंताच्या आर्यांनींच रामजोशाची वृत्ति हरिकीर्तनाकडे वळविली. त्या पूर्वी ते कलगीतुऱ्याच्या नादांत असून, लावण्यांच्या छंदावर कवनें करून स्वच्छंदानें डफ, तुणतुणें, सारंगी आणि नाचेपोरे हातीं घेऊन चरितार्थ चालवीत होते. ही वेळ बाजीराव रघुनाथ पेशवे यांच्या विलासाच्या आरंभाची असावी अशी अटकळ होते. त्या काळीं रावबाजीच्या उत्तेजनानें पुणें शहरांत व त्या शहराचा वारा लागून जेथें तेथें शिमग्याचें चांदणें वाढत चाललें होतें. दिवसास ब्रह्मभोजनाचा थाट आणि दिव्यांत वात पडली नाहीं तों मंदिरांत चौघडे सनया यांचा मंजूळ घोष; श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाड्यांत सरकारी तायफांचे मुजरे; रात्रीस रस्त्यांत आणि बोळांत फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेणारे नुकतेच चिमणी, साळू, मैना यांच्या मंजूळ कंठांत होनाजी बाळानें घातलेले खडे सूर आणि फौजेकडील शिलेदार, बारगीर, शिपाई आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, माळी, सराफ, दुकानदार, यांना रिझविण्याकरितां बहिरू, मल्हारी, धोंडीबापु, सगनभाऊ आणि रामा गोंधळी यांनीं सजविलेले डफतुणतुण्याचे तमाशे आणि कलगीतुऱ्यांचीं भांडणें; हे सर्व थाट रावबाजीच्या उल्लसित मनोवृत्तीच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते. मग 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्या प्रेरणेचा अंमल सर्व पेशवाईंत पसरला नसेल असें संभवत नाहीं. त्या काळीं सर्व गुणिजनांचे आशेनें भरलेले डोळे पुणे शहराकडे लागले असून, त्या शहरानें जो कित्ता घातला होता, त्याची नक्कल जेथें तेथें होऊन कित्येक ठिकाणीं त्या नकलेवर ताण करणारे उमेदवारही निपजूं लागले. रामजोशांसही यद्यपि अशा उमेदवारांमध्यें गणिलें, तथापि त्यांच्या गुणांस न्यूनत्व न येतां उलटी ती त्यांची उमेद प्रशंसेस पात्र होईल; कारण त्यांच्या कवनावरून रामजोशी हे चांगले व्युत्पन्न आणि साहित्यशास्त्रज्ञ असावे असें अनुमान होतें. असें असतां त्यांनीं आपलें लक्ष त्या काळाच्या इतर पंडितांप्रमाणें सभेंत शुष्क वादविवाद करून शालजोड्यांची आणि दक्षिणेची प्रतिष्ठा मिळविण्याकडे न लावितां, सर्व लोकांचें मनोरंजन करून त्यांमध्यें वाहवा मिळविण्याकडे लाविलें, हें आश्चर्य होय. त्यांत आणखी ब्राह्मणानें विद्वानाची पूज्य प्रतिष्ठा तुच्छ मानून केवळ लोकरंजनार्थ शूद्रवृत्ति धारण करून तमासगिरांच्या निर्भर्त्सनेचा अंगिकार केला. येणेंकरून रामजोशी हे मोठे उदार मनाचे पुरुष होते असें दिसतें;

तसें असल्यावांचून त्या काळीं इतक्या धैर्याचें कर्म त्यांजकडून घडणें कठीण. म्हणून माझ्या मतें ते मोठे प्रशंसेस योग्य होत. जर राघो धंवडा, मार्तंडा शिंपी, बहिरू, मल्हारी न्हावी, सगनभाऊ मुसलमान, अनंतफंदी ब्राह्मण, आणि रामा गोंधळी; यांनीं आपआपले फड तयार करून डफावर थाप मारल्याबरोबर पुणें शहरांत हजारों लोकांचे थवे आपल्या तमाशांत ओढून आणून त्यांस रिझवून त्यांजपासून ओंजळी भरभरून रुपये, जरीचे दुपेटे आणि भरगच्ची शेले घेतले; तर मग रामजोशी ब्राह्मणानें आपल्या संस्कृत वाणीच्या बळानें त्यांजपेक्षां अति सरस रीतीनें वरल्या थराच्या लोकांस रिझवून आपला प्रपंचनिर्वाह कां चालवूं नये ? आणि तसा त्यानें चालवावयास आरंभ केला इतक्यावरून आतां तो आपल्या प्रशंसेस मुकला असें माझ्यानें अगदीं म्हणवत नाहीं. आणखी माझ्या ऐकण्यांत आहे कीं, या विद्वान पुरुषाची प्रकृति विलासी आणि कांहींशी फक्कड होती. अर्वाचीन स्मृतिकार आणि भट्ट यांच्या पद्धतीवरून अत्यंत संकोचित झालेलीं जीं ब्राह्मण जातीचीं मनें, त्याप्रमाणें यांचें मन संकोचित नव्हतें. सोंवळेओंवळे आणि बाहेरील दांभिक आचार यांची त्या काळीं मोठी दांडगी पुष्टि पाहून यांच्या मनानें कंटाळा घेतला होता; इतकेंच नाहीं, परंतु अशा दांभिकांनीं असें आपलें शोचनीय अज्ञान टाकून सत्याकडे आपलें मन वळवावें, एतदर्थ या सत्पुरुषाचा उपदेशही चालू होता असें यांच्या कृतीवरून दिसतें.

रामजोशांच्या वेळेस लावण्यांच्या छंदावर कवनें करण्याचा चांगला प्रघात पडून गेला होता; आणि तो छंद साहजिक कर्णांस मधुर असल्यानें लोकांची त्यावर आवड पाहून जोशीबावानेंही आपलीं कवनें बहुधा त्याच मधुर छंदावर रचण्यास आरंभ केला. प्रापंचिक जनाचें मन लुब्ध करण्याकरितां केव्हां केव्हां या रसिक पुरुषानें या छंदांत शृंगाररसही प्रौढ आणि कोमल अशा शब्दांनीं संस्कृत भाषेंत तद्रसप्रधान काव्यांत जसा वर्णिला असतो तसा नमुना घेऊन वर्णिला आहे. परंतु त्यांत आणखी इतकी खुबी ठेविली आहे कीं, जरी शब्दयोजनेंत तो नमुना घेतला आहे, तरी तो आपल्या काळाच्या लोकव्यवहारास अनुसरून घेतला आहे. आणखी रामजोशाच्या कवनांत दुसरी खुबी अशी आढळते कीं, प्रौढ संस्कृत शब्द आणि शुद्ध लौकिक मराठी भाषणांतील केवळ ग्राम्य शब्द, यांची भेळ इतकी बेमालूम केली असते कीं, त्यांच्या त्या मिश्रणचातुर्यानें तें सर्व एकरंगी दिसून त्यापासून एकजातीचा विशेष आनंद उत्पन्न होतो. कोणा एका स्त्रीचें सौंदर्य पाहा जोशीबावानें कसें सरस निर्मळ वाणीनें वर्णिलें आहे:—

कोण्यागसुभगाचीमदनमंजरी सांगसखेसुंदरी ॥ धृ० ॥
इच्यासौंदर्याचीसीमा झालीगडेरतिहुनिअत्युत्तमा
पाहुनियामुखचंद्रमा खखंगडेश्रमागमतिपौर्णिमा

कापअधरनारकिंमा आरबीनवकुंकुमविद्रुमा
अशीवसनजिच्यीभर्जरी कोण्यागसुभगाची० ॥ १ ॥

मजवाटकीविपबटी भलींगस्वरूपाचीउतरलीभटी
उरीकंचुकीघट्टतटतटी टिळकललाटींसुभारसपटी
देखतांलसतपटकटी कुशाहरिचीफुटीलटपटी
अशीअनंतगुणगुर्जरी कोण्यागसुभगाची० ॥ २ ॥

शिरींसुंदरवनमल्लिका झटतिवरमधुकररसकौतुका
नयनानन जनरंजिका ? मधुरकंठांतलाजवीपिका
अशीवर्णीलकोणसदलिका ? इतरकवीकविरायाहुनिफिका
मजवाटतसेनिर्जरी कोण्यागसुभगाची० ॥ ३ ॥

कोठें कोठें या त्यांच्या शृङ्गाररसांत बीभत्स रसाचेंही मिश्रण आढळतें; तथापि तें लोकव्यवहारास आणि या देशांतील प्राकृत जनाच्या दांढग्या रुचीस अत्यंत अनुकूल असल्यानें तितकें विगर्हणेस पात्र होत नाहीं. एका लावणींत कृष्णाच्या बाळपणींच्या खोडींचें आपआपलें गाऱ्हाणें गोपिकांनीं यशोदेसमोर नेलें, त्यांच्या वर्णनांत बीभत्स रस बराच आढळण्यांत येतो; परंतु त्या काळीं व सांप्रतही चांगल्या प्रतिष्ठित जातीच्या बायकांचीं भांडणें लागलीं असतां आणि त्यांत विशेषेंकरून लग्नसमारंभांत दोघी विहिणीकडील बायकांमध्यें परस्पर जो फाल्गुनाच्या भाषणांचा वर्षाव होतो तो ध्यानांत आणिला असतां, जोशीबावानें गोकुळाच्या गौळणींच्या मुखांत अधिक बीभत्स भाषणाचें वैरण घातलें असें मला वाटत नाहीं. आतां भगवान कृष्णानें आपल्या ठायीं अत्यंत सप्रेम मनोवृत्ति पाहून ज्यांचा उद्धार केला, त्या श्रीमद्भागवतांत शुक मुनीनें वर्णिलेल्या परम भाग्यवती गोपी, यांस नीच बाजारबसव्यांच्या योग्यतेस आणावें आणि परमपुरुष भगवान बालकृष्ण याच्या पदरांत अधम जातींत उत्पन्न झालेल्या एखाद्या कारट्यास योग्य ज्या खोडी त्या बांधाव्या, हें कृत्य सत्कवीस उचित किंवा अत्यंत अनुचित हा पाहाण्याचा प्रकार जो आहे तो स्वतंत्र आहे. तो अंमळशानें स्वाभिप्रायपूर्वक निवेदन करीन. प्रस्तुत इतकेंच सांगावयाचें कीं, रामजोशानें आपल्या लावण्यांत शृङ्गाररसाशिवाय आणखी भर्तृहरीप्रमाणें वैराग्यविषयही फार सरस वर्णिला आहे. यावरून असें दिसतें कीं, रामजोशाचें बाह्याचरण जरी विलासी जनाच्या आचरणासारखें होतें, तरी त्याचें अंत:करण केवल विषयासक्त नव्हतें. आणखी असें दिसतें कीं, हे कविराय ज्या ज्या प्रसिद्ध स्थानीं देवदर्शनास गेले त्या त्या स्थानांच्या देवतांचेंही त्यांनीं प्रार्थनापूर्वक गुणवर्णन केलें आहे. या सर्व गोष्टींचा

वचार केला असतां माझी अशी अटकळ होते कीं, हे कक्कड कविराय आपल्या पहिल्या भरांत त्या काळच्या लोकांची रुचि पाहून उपजीविकेकरितां जरी तमासगिरांच्या मंडळींत शिरले असले; तथापि पुढें आपले कवि मोरोपंत यांच्या प्रौढ, उद्दाम आणि सरस अशा कृतीचें जेव्हां यांस दर्शन झालें तेव्हां ते तिला मोहित होऊन त्यांनीं लोकरंजक डफ टाकून लोकोपदेशक वीणा उचलला असावा; अशी अटकळ करण्यास माझी मनदेवता लवती. पाहा, त्यांनीं लोकांच्या बाहेरीक दांभिकाचरणावर आणि धर्माच्या नुसत्या सोंगावर कसे रेशमी कोरडे लाविले आहेत ते.

भलाजन्महातुलालाधलाखुलासहृदयींबुधा
धरिसितरिहरिचासेवकसुधा ॥ धृ० ॥

चराचरींगुरुकरावयासींनराशिरावरिहरी
जरातरिंसमजधरींअंतरीं ॥

हट्टातटानेंपटारंगवुनिजटाभारकांशिरीं
मठाचीउठाठेवकांतरी ॥

वनांतअथवाजनांतहोकांमनांतभलतेपरी
हरीचेंनांवभवाब्धीतरी ॥

॥ चाल ॥ कायगळ्यांतघालुनितुळशीचींलांकडें ।
हींकायमवालादुरकरतिलमांकडें ॥
बामिरविशिबाहेरआंतहरिशींवांकडें ।
अशाभक्तिच्यारसारहिततूंकसाम्हणविशीबुधा
* * * ॥ भलाजन्म० ॥ १ ॥

जाळगळ्यामध्येंमाळकशालाव्याळकामकोपला
आंतडणावाहेरम्हणविशीभला ॥
वित्तपहातांचित्तयेतसेकीर्तिपाहिजेमला
असेंहरिम्हणतांनुमजेतुला ॥
दांभिकवरसभाविकपणेंअभ्यंतरींनाहींचबिंबला
बहिर्मुखनरनरकालाघला ॥

॥ चाल ॥ तूंपोटासाठींखटपटकरमलतिशी ॥
परिभक्तिरसाविणहरिभेटेलकायतुशीं ॥
कायमौन्यधरुनिगोमुखिलाजाळिशी ॥
स्वार्थसुखेंपरमार्थबुडविलाअनर्थकेलाबुधा ॥
जाणुनिविषपीसीह्मणशीसुधा ॥ भलाजन्म० ॥ २ ॥

टिळाटोपिवरशिळपडोयाविळातकरिशिळजपा
तथापितद्वोयहरिचोकृपा ॥
दर्भमुष्ठिचेयमीधरोनिनिर्भयपशुच्यावपा
कायजाळुनितिळातांदुळातुपा ॥
दंडकमंडलुवेडमाजविशिमुंडमुंडशीवपा
नसार्थकलटक्यासाऱ्यागपा ॥
॥ चाल ॥ बारबारतलवारहोइलकायपुन्हा ।
हानरदेहदुर्लभकांठेविशीशुना ॥
भगवंतभुकेलाभक्तीचापाहुणा ।
धर्मंघडेनावर्मकळेनायामनालाकदा ॥ ?
सदाहरिकविरायावरिफिदा ॥ भलाजन्मे० ॥ ३ ॥

मग अशा परम रसिक आणि वक्त्या हरिदासाच्या मुखापासून प्रथमतः समंजस लोकांस जेव्हां मोरोपंतांच्या प्रौढ आणि रसभरित आर्यांचें श्रवण होऊं लागलें असेल, तेव्हां त्यांच्या कीर्तिसह त्यांची कृति या देशांत व देशांतरीं प्रसृत होण्यास विलंब लागला नसेल, असें सहज अनुमान होतें.

मी अद्यापि मोरोपंतांच्या साद्यंत कृतीविषयीं अनभ्यस्त आहे, तथापि त्यांनीं केलेल्या भारताच्या कांहीं पर्वांतील व इतर स्फुट आर्या येथें तेथें पाहिल्या आहेत आणि ऐकल्या आहेत; तशींच त्यांनीं इतर छंदावर केलेलीं कवनेंही ऐकिलीं आहेत; त्यावरून, आणि प्रकृत स्तोत्राचें लक्षपूर्वक पर्यालोचन केल्यावरून, माझ्या मनाचा दृढ निश्चय झाला आहे कीं, मोरोपंतांची वाणी मोठी प्रौढ आणि कारुण्यवीरादि रसांनीं परिप्लुत अशी आहे. त्यांत आणखी रसान्वित यमकें साधण्याची तर हातोटी या कवीप्रमाणें कोणत्याही इतर महाराष्ट्र कवीची आढळत नाहीं. अशीं रसान्वित यमकें साधूनही इतका विपुल ग्रंथ रचणारा महाराष्ट्र भाषेंत हा एकच कवि. मला वाटतें अशीं यमकें साधण्याचा कित्ता मोरोपंतांनीं वामनपंडितांकडून घेतला असावा[२]. परंतु वामनापेक्षां मोरोपंतांची वाणि अधिक शुद्ध आणि

---

१ या जोशीबावाच्या कवनांचें कोणाजवळ शुद्ध पाठांतर असल्यास पाहून घ्यावें.

२ मोरोपंतांनीं आपल्या सन्मणिमालेंत जसें इतर संतांचें तसें वामनाचें स्तवन केलें आहे. परंतु त्याशिवाय त्यांनीं वामनपंडिताचें आणखी स्वतंत्रही स्तवन केलें आहे. त्यांत ते म्हणतात;—

अन्यत्रनसेकवनीं यावेरससर्वहानियमकांहीं ।
केलीभाषाकविजे त्यांचीतोंगर्वहानियमकांहीं ॥

रसभरित होय असें म्हणण्यास मला भय वाटत नाहीं. तथापि जो वेदांतशास्त्र-विषय वामनानें अंगीकृत केला, तो स्वभावत: परम गंभीर आणि प्रगल्भ असल्यानें, स्वाभिप्रेतार्थाचें यथेच्छ मंथन व्हावें याकडे जसें त्या महापंडिताचें लक्ष होतें, तसें शब्दशुद्धीकडे आणि रसअलंकाराकडे नव्हतें. तथापि धन्य वामन कीं, इतका प्रगल्भ शास्त्रविषय असतां त्यांनीं ज्या चातुर्यानें त्याच्या विचाराचें या रंक महाराष्ट्र भाषेंत सूक्ष्म आणि प्रांजळ निरूपण केलें आहे, त्याचें जे कोणी लक्षपूर्वक मनन करतील, त्यांच्या दृष्टीसमोर हा उक्त दोष अगदीं वितळून जाईल. मोरोपंतांचा विषय इतिहासकथन आणि स्तवन होय. म्हणून त्यांस आपल्या कवनांत रस, अलंकार, प्रास, आणि यमकें साधण्यास अधिक अवकाश होता; परंतु तितके चारही प्रकार रम्य आणि उत्कृष्ट रीतीनें साधून पुनः शुद्ध शब्दांच्या निवडाकडे जें त्यांनीं अपूर्व लक्ष दिलें, तेणेंकरून तर त्यांनीं रसिक आणि भाषाभिज्ञ अशा विद्वज्जनांच्या स्तुतिदानग्रहणाविषयीं पर्वकाळच साधिला. त्यांच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा इतका प्रचुर असून त्यांनीं तितक्या शब्दांचे वर्ण आणि ऱ्हस्व-दीर्घत्वही अबाधित संभाळिलें, येणेंकरून तर त्यांच्या चातुर्यभरित बुद्धीनें आपल्या वाणीस पवित्रतेचा पाटाव नेसविला. आतां त्या काळीं महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाचा अभाव होता या कारणास्तव, आणि त्यांचें काव्य छंदांच्या पराधीनतेंत होतें या कारणास्तव, निवळ प्राकृत आणि प्राकृत भाषेच्या पंक्तींत शिरून भ्रष्ट झालेले असे संस्कृत शब्द, यांच्या प्रक्रियेविषयींची शब्दाची तितकी शुद्धता आणि ऱ्हस्वदीर्घत्व यांचें जोंबाळणें परम दुःसाध्य, म्हणून तितक्यापुरताही आपल्या कवीवर दोषारोप करण्यांत विचारच केला पाहिजे. किंबहुना, सांप्रत महाराष्ट्र व्याकरणाचा इतका जागोजाग प्रचार झाला असतांहि अद्यापि त्या शास्त्राच्या नियमाप्रमाणें लिहिण्याकडे कोणीं जसें सूक्ष्म लक्ष द्यावें तसें देत नाहीं; मग ज्या काळीं त्या विषयाचा मुळींच अभाव होता, त्यांत आणखी छंदांत व प्रास साधून ग्रंथ रचण्याचा प्रसंग, त्या काळीं अशी अघटित आशा बाळगणें ही आपल्याच विचारशक्तीची न्यूनता आपण पद ी घेतली पाहिजे. तथापि धन्य मोरोपंत, कीं इतका अपरिहार्य प्रसंग असतां आपल्या परम रसिक काव्यांत संस्कृत शब्दांची शुद्धि राखूनहि, प्राकृत शब्दांच्या योजनेंत सानुनासिक निरनुनासिक वर्णांपर्यंत जितकें त्यांच्यानें त्या काळीं सूक्ष्म लक्ष देववलें तितकें जागोजाग त्यांनीं दिलें आहे, हें पाहून तर मला मोठा विस्मय होतो.

आतां आपल्या कवींच्या काव्यचातुर्याचें यथास्थित प्रांजळ आणि सप्रमाण विवेचन करणें हा स्वतंत्र विषय त्यांच्या संपूर्ण काव्याच्या लक्षपूर्वक अभ्यासाच्या आधीन होय; आणि तसा अभ्यास मजकडून घडल्याचें माझें मन मला साक्ष देत नाहीं. तथापि त्यांच्या काव्याचें जें यत्किंचित् अवलोकन मला घडलें आहे, त्या-

वरून जरीच त्याचें दिग्दर्शन तरी करून दाखविणें प्रकृत विषयास अपेक्षित आहे, तसें करण्यास मी आपल्या वाचकांची आज्ञा मागतों.

साध्वी स्त्रियांनीं कोणत्या सदाचरणांनीं आपल्या पतीस वश करावें म्हणून भारतांत वनपर्वांत द्रौपदी आणि सत्यभामा यांच्या संवादांत सत्यभामेनें द्रौपदीस पुसलें; त्या तिच्या प्रश्नास हें द्रौपदीचें प्रत्युत्तर पंतांनीं पाहा कसें सरस ग्रथित केलें आहे:—

सत्याकृष्णांसिम्हणे वदस्यें तें तूं खरें चमानसये ।
लोकम्हणोतपरिपळहि माझ्याहातीनकोंतमानसयें ॥ ५७ ॥
त्वांहिपांचपतिकसे वशकेलेभजतिसर्वएकीतें ।
थोडेंयाहुनिपाहुनि नटतोकादंबिनीसकेकीतें ॥ ५८ ॥
सांगवशीकरणकसें केलेंवांदेविकोणत्यामंत्रें ।
कींदिव्यौषधिमूळें किंवावारस्यायनोदितेंयंत्रें ॥ ५९ ॥
कृष्णाहांसोनिम्हणे भामेमोहावयाधिपतिलाजे ।
मंत्राद्युपायकरणें याश्रवणेंबहुमदीयमतिलाजे ॥ ६० ॥
प्रेमेंपतिचरणांशिंन देउनिदेहातततायितालाजे ।
तेव्हांनरुचेपतिला कीतीतेंआततायितालाजे ॥ ६१ ॥
जाणेंवशीकरणहें करित्यंजेणेंकधींनकोपतितें ॥
सखितूंहिअसेंचिकरीं मदमत्सरदाखवूंनकोपतितें ॥ ६२ ॥
पतिपरमेश्वरचरणा जीतत्सेवार्थनवशीकरणें ॥
तीमुग्धाकैंशीगे वळवीलस्वामिमनवशीकरणें ॥ ६३ ॥
पतिचेप्रसाददेती ज्यासद्गतितेंनयोगसवतीतें ॥
वाहेपहाशिरींशिव देहार्धमताशिवास्वसवतीतें ॥ ६४ ॥
श्रुतिलाकविधींसीती मानवलीफारशुद्धवदलीला ॥
नपतीसचिकर्णीसहि सत्यसतीहोतिउद्धवदलीला ॥ ६५ ॥

वनपर्व. अ० ६

यांत सत्या म्हणजे सत्यभामा ( येथें केवळ पंतांनींच छंदार्थ पुढलें भामापद काढून टाकिलें असें कोणीं समजूं नये. मूळ भारतांतही तिला सत्या म्हटलें आहे ) कृष्णेला म्हणजे द्रौपदीला म्हणते, मीं जें—सये तुला सांगतें तें तूं खरेंच मान, ( म्हणजे यद्यपि खरें मानण्याजोगें नाहीं, कांकीं, मी कृष्णपत्नी असून पुढें सांगतें तशी गोष्ट होणार नाहीं, तरी तूं क्षणभर उदाहरणाकरितां तरी खरें मानून घे, असा येथें च या अन्वयानें आणि 'लोक म्हणोत' या पुढल्या तिच्याच म्हणण्या-

वरून ध्वनितार्थ मिघतो. आणखी सये या संबोधनानें आपला स्नेहभाव दाखवून जें पुसणार त्या प्रश्नाचें गुह्यत्वही इंगित केलें. ) तें काय पुसशील तर ऐक- लोक म्हणत असल्यास म्हणोत, परंतु माझ्या हातांत एक पळभरही, कांतमानस म्हणजे नवऱ्याचें मन, नये-येत नाहीं. अर्थात् माझ्यानें कृष्णास अगदीं वश करवत नाहीं ॥ ५७ ॥

अशी मी सौंदर्यादिगुणयुक्त असतां, आणि कृष्णासारखा माझा पति असतां ही माझी स्थिति, आणि तुझी पाहातें तों-त्वां हे-धर्मभीमादि,- पांच पति, तुला-एकीला-एकलीला, भजतात-म्हणजे तुला अत्यंत वश आहेत, असे-कसे वश केले; ( अर्थात् तुझ पांच पति असून स्वभावतः ते परस्परांविषयीं साशंक असावे, आणि त्यांतून एकानेंहि तुजविषयीं प्रेम धरूं नये, अशी स्वाभाविक गोष्ट असतां ते पांचही तुला एकलीला अगदीं वश होऊन गेले आहेत; असे कसे वश केले म्हणजे कोणत्या उपायानें त्वां त्यांस वश केलें आहे ? ) आतां ते कसे वश होऊन गेले आहेत हें कवि पुढल्या सरस दृष्टांतानें सांगतात-केकी[1] म्हणजे मोर कादंबिनीस[2] -म्हणजे मेघांच्या पंक्तीस पाहून, नटती—नाचतात, तें याहून थोडें; म्हणजे मेघांच्या पंक्तीस पाहून मोर नाचतात. इतकें मोरांचें तिजवर प्रेम आहे, तेंही या धर्मादिकांचें तुझ्या ठायीं जें प्रेम आहे त्याहून थोडें; इतकें त्वां जें त्यांस वश केलें तें कसें असा संबंध. ( येथें कवीनें या दृष्टांतानें मयूरांस कांत करून कादंबिनी त्यांची कांता असें दाखविलें आहे. आणखी त्या कादंबिनीच्या दर्शनेंकरून जी मयूरांच्या ठायीं नृत्य करण्याची उत्सुकता, तिणेंकरून मयूरांच्या ठायीं कादंबिनीविषयक नुसती पराधीनता दर्शविली इतकेंच नाहीं, परंतु तिच्या आल्हादजनक गुणांनीं मयूरांच्या ठायीं त्या नृत्यानें आल्हादजननही सुचविलें; यावरून द्रौपदीच्या गुणाचें आनंदजनकत्व आणि त्या तिच्या गुणांनीं धर्मादिकांचें लुब्धत्वही आधिक्येंकरून इंगित केलें आहे. म्हणून येथें या सरस मयूरनृत्याच्या दृष्टांतानें उत्प्रेक्षा आणि पुढें व्यतिरेक असे दोन अलंकार कवीनें फार सरस साधिले आहेत. ) ॥ ५८ ॥

आतां अशा तुझ्या आनंदजनक गुणांनीं कोणत्या उपायांनीं तुझ्या पांच पतींस वश केलें हा प्रश्न पुसत असतां, प्रथमतः सामान्य स्त्रिया आपल्या पतींस वश करण्याकरितां लोकप्रसिद्ध जे उपाय आचरितात ते सत्यभामा तिला सांगते-

---

१ मयूरोबर्हिणोबर्हीनीलकंठोभुजंगभुक् शिखावलःशिखीकेकी-इ०

२ कादंबिनीमेघमाला—

—अमर

देवि–हे देवि–हे द्रौपदे बाई, त्वां कोणत्या मंत्रें कसें वशीकरण केलें तें–सांग,–कीं किंवा दिव्यौषधिमूळें किंवा वात्सायनोदित यंत्रें वश केलें तें सांग असा येथें संबंध जाणावा. यांत जारण, मारण, उच्चाटण, इत्यादि जे विशेष करून तांत्रिक ग्रंथांत प्रयोग सांगितले आहेत, त्यांत वशीकरण म्हणजे दुसऱ्याचें मन वश करण्याचा एक प्रयोग प्रसिद्ध आहे तो, मंत्र, दिव्यौषधीचें मूळ, आणि यंत्र, ( म्हणजे वर्तुळ त्रिकोन अष्टकोन आदिकरून आकृतिविशेष काढून, त्यांत स्थानें पाडून त्या स्थानांत अकारादि इष्ट वर्ण लिहून पूजनार्थ जें साधन त्या त्या ग्रंथांत त्या त्या मताच्या आचार्यांनीं सांगितलें आहे तें ) यांच्या साधनानें सांगितला आहे. ॥ ५९ ॥

या प्रश्नाचें उत्तर द्रौपदी देते–कृष्णा हांसून म्हणते. भामे–हे सत्यभामे, जे पतिला मोहायास मंत्राद्युपाय–त्वां सांगितले. मंत्रादि उपाय करणें; या श्रवणें–हें ऐकिल्यानें मदीय मति–माझें मन, बहु लाजे–फारच लाजतें. ( यांत द्रौपदीच्या हांसण्यानें सत्यभामेच्या प्रश्नाचें किंचित् विगर्हितत्व इंगित होतें; आणि अशा प्रश्नाच्या श्रवणमात्रेंकरून तिनें आपल्या मनाच्या लज्जेचें कथन केल्यानें तिच्या मनाचा थोरपणा येथें कवीनें इंगित केला आहे ) ॥ ६० ॥

आणखी द्रौपदी म्हणते–जे स्त्री प्रेमें पतिचरणाशीं हात न देउनि तायिताला दे, ते स्त्री पतिला न रुचे;—कीं तीतें आततायिता लाजे;—म्हणजे जी स्त्री आपला हात प्रीतीनें नवऱ्याच्या पायांस लावावा तो न लावितां ताइताला लाविते, अशी स्त्री नवऱ्याला आवडत नाहीं; किंबहुना अशा स्त्रीस आततायिता म्हणजे धृष्टताहि लाजे–लाजते. ( सारांश, आपल्या नवऱ्याच्या ठायीं निर्मळ प्रीति ठेवावी ती सोडून जी बायको देवऋषीकडे जाऊन त्याजवळून भारलेला ताईत घेते, म्हणजे आपला प्राणवल्लभ जो पति त्यास प्रेमानें आपल्या गळ्यांतला ताईत करावा, तसें न करितां, जी स्त्री त्या नवऱ्याची प्रीति आपल्यावरच राहावी म्हणून धुतारे लोकांकडून कायणु बायणु घेऊन, त्यानें भारलेला नुसता ताईत आपल्या गळ्यांत बांधिते. अशा स्त्रीवर नवऱ्याची प्रीति कदापि बसणार नाहीं; उलटें अशी धीट साहस करणारी बायको निंदेस मात्र पात्र होईल. ( यांत कवीनें अभिप्रेतार्थाचें सरस कथन करून शेवटीं यमकही फार सुंदर साधिलें आहे. ) ॥ ६१ ॥

हें मूढ बायकांचें वशीकरण तुला सांगितलें; आतां माझ्या वशीकरणाचा प्रकार ऐक, आणि तसें तूं कर, म्हणून द्रौपदी सत्यभामेस सांगते—जेणें न कोपति–जेणेंकरून, पति–कोपणार नाहींत, तें करितें–अर्थात तें आचरण मी करितें; हें वशीकरण जाणें–मी वशीकरण जाणतें तें हें, अर्थात् नें इन्द्र कीं,

ज्या आचरणानें पतीस कदापि कोप येणार नाहीं; माझ्या वशीकरणाचा उपाय काय तो असें आचरण, म्हणून-सखि तूंहि असेंच करी-हे सखे, तूं असेंच माझ्या-सारखें कर; ( येथें सखि या संबोधनानें द्रौपदीनें आपला स्नेहभाव प्रदर्शित केला ); आतां पति रागें भरणार नाहींत असें कोणतें आचरण पुसशील तर-पतितें मदमत्सर दाखवूं नको-आपल्या नवऱ्याला कदापि मद दाखवूं नको आणि मत्सरहि दाखवूं नको. ( सर्व स्त्रियांना सर्व प्रकारच्या आपआपल्या नवऱ्यांच्या मनांतून क्रोध घालवून त्यांची प्रीति संपादन करण्याचा हा मोठा अमोघ उपाय येथें द्रौपदीनें सांगितला आहे असें समजलें पाहिजे. जी स्त्री आपला गर्व दाखवीत नाहीं, आणि जरी तिनें आपल्या नवऱ्याचें एखादें दुर्वृत्त आचरण ऐकिलें, तरी त्याविषयींचा आपल्या मनांतला मत्सरभाव त्याला न दाखवितां प्रीतीच्या बोधानें तें त्याचें दुराचरण घालविण्याचा प्रयत्न करिते, अशी कुशल साध्वी स्त्री आपल्या नवऱ्यास जिंकील यांत संशय नाहीं. मात्र तो नवरा पशूसारखा पाषाणहृदयाचा नसावा; अशा पशुपुढें मात्र स्त्रियांचा उपाय चालत नाहीं. ) येथेंही कवीनें सरस अर्थ दाखवून यमकही सुंदर रीतीनें साधिलें आहे. ॥ ६२ ॥

आणखी-जी नवशीकरणें तत्सेवार्थ पतिपरमेश्वरचरणा न (वळवील) ती मुग्धा वशीकरणें स्वामिमन कैशी गे वळवील ?—जी स्त्री नवस कर-ण्यानें ( येथें कवीनें नवशीकरण असा शब्द साधून त्याची तृतीया केली आहे ) तत्सेवार्थ-अर्थात् आपल्या पतीच्या सेवेकरितां. पतिपरमेश्वरचरणा-पति हाच आपला परम ईश्वर अथवा मुख्य धनी त्याच्या पायातें, न वळवील—वळ-विणार नाहीं-म्हणजे वश करणार नाहीं, ( येथें पायांस वश करण्यानें पतिव्रतेचा अत्यंत नम्रीभाव प्रदर्शित होतो, ) ती मुग्धा-ती वेडी, वशीकरणानें, आपल्या-स्वामीचें मन, कशी गे वश करील ? अर्थात् प्रीतीनें नवऱ्याची सेवा सोडून जी बायको त्याचें प्रेम आपल्यावर असावें म्हणून देवांस नवस करीत फिरते, ती वेडी पूर्वोक्त वशीकरणाकरितां टाणेटोणे करून आपल्या नवऱ्याची प्रीति कशी संपादन करील ? अर्थात् कदापि करणार नाहीं. ॥ ६३ ॥

आतां पतिप्रसन्नतेचें महत्फल द्रौपदी सांगते-पतिचे प्रसाद तीतें ज्या सद्गतितें देती--पतीची प्रसन्नता, तीतें-त्या पतिव्रता स्त्रियेला, जी सद्गति देते; न योग सव-योग नाहीं, आणि सव-म्हणजे यज्ञ[1] नाहीं; अर्थात् ती सद्गति तिला योग देणार नाहीं, आणि यज्ञही देणार नाहीं. यास दृष्टांत-पहा शिवदेहा-र्धमता-शिवाची अर्धदेहा म्हणून मानलेली जी, शिवा—म्हणजे पार्वती, स्वस-

१ यज्ञः सवोऽध्वरो यागः सप्ततंतुर्मखः क्रतुः
—अमर.

वतीतें-आपल्या सवतीला-अर्थात् गंगेला, आपल्या-शिरीं वाहे-माथ्याव वाहते.—( या दृष्टांतानें आपला प्रति महादेव याची प्रसन्नता संपादण्याकरिता त्याच्या अर्धांगीं असतां ती पार्वती गंगेविषयीं आपला सवतमत्सर टाकून उलटे आपल्या माथ्यावर तिचें वहन करिते; येथें कवीनीं पूर्वी ६२ व्या आर्येत मत्सर टाक म्हणून जो द्रौपदीनें सत्यभामेस उपदेश केला आहे, त्याच्या समर्थनाकरितां हा दृष्टांत फारच सरस योजिला आहे; आणि प्रकृत पतिप्रसादाच्या फलाच्या दृष्ट्या सही हा दृष्टांत फारच अनुकूल आहे, असें येथें समजलें पाहिजे. ॥ ६४ ॥

तो द्रौपदीचा उपदेश सत्यभामेस फार रुचला असें सांगत असतां कवि म्हणतात-श्रुतिला कविधी असी शुद्धवदलीला ती फार मानवली.-श्रुतिला-कानाला, कविधी-ज्ञात्यांची बुद्धि अशी शुद्धवदलीला-शुद्ध रीतीनें अर्थात् सम्य रीतीनें जी वदली-वदली गेली तिला-म्हणजे सम्यक् रीतीनें जिला उपदेश केला अशी जी सत्यभामा तिला ती-अर्थात् ती द्रौपदी फार मानवली-मान्य झाली-आवडली; म्हणजे कर्णांस जशी सूज्ञ पुरुषाची मति आवडते, तशी त्या सत्यभामेला ती द्रौपदी आवडली; अर्थात् तिचा हा पूर्वोक्त उपदेश आवडला. आणखी अर्थांतरन्यासेंकरून कवि सांगतात-उद्धवद-लीला-पतिसचि न कर्णांसहि सत्य सती होति-कारण-उद्धवद-लीला-उद्धव म्हणजे उत्साह-आनंद त्यातें देणाऱ्या ज्या लीला, अथवा-उद्धवद-आनंद देणारी जी पतिव्रता कामिनी तिच्या ज्या-लीला-चरित्रें केवल नवऱ्यासच नाहींत तर-कर्णांसहि-म्हणजे इतर ऐकणारांच्या कानासही सत्य-म्हणजे खऱ्या अशा सती-अर्थात् साध्वी स्त्रियांप्रमाणें मनोरमा अशा होतात; अथवा उद्धवलीला-आनंद देणाऱ्या आहेत लीला ज्यांच्या अशा कामिनी ( बहुव्रीहि ) केवळ आपल्या पतींसच सती दिसतात असें नाहीं, तर कानांसहि सती-म्हणजे साध्वी अशा वाटतात; अर्थात् त्यांचे चरित्र त्यांच्या पतींसच आनंद देतें, इतरांच नाहीं, परंतु त्यांचें चरित्र ऐकणारे जे इतर जन त्यांच्या कानासही तें त्यांचें चरित्र अत्यंत मधुर लागतें असा अर्थ. ॥६५॥

हा वरील वेंचा म्यां उगीच उदाहरणाकरितां अचानक काढून वाचकांपुढें सार्थ सादर केला आहे; यावरून सहज त्यांच्या ध्यानांत येईल कीं, आपल्या कवीची वाणी प्रौढ, गंभीर आणि गीर्वाण शब्दांनीं प्रचुर, अशी असून, त्यांनीं

---

१ येथें कवीनें संस्कृत भाषेच्या व्याकरणाप्रमाणें **वदणें** या क्रियेचा कर्मकर्तरि-प्रयोग केला आहे. ‘ सराजा ऋषिणा उक्तः ’—म्हणजे ऋषीनें ज्यास सांगितलें—ज्या बरोबर ऋषि बोलला तो राजा, अशा क्त-प्रत्ययान्त धातुसाधिताचा जसा या बाबतींत कर्मकर्तरिप्रयोग तसाच येथें कवीनें **वदला** म्हणजे **वदलेली** असा धातुसाधित विशेषणाचा प्रयोग करून त्याच्या चतुर्थीचें रूप केलें आहे असें मला वाटतें.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारास वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।≈, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈ मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं

प्रकाशक—**श्रीसाई लीला**

Register No. B. 1728.


सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक
श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ৶१४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसांनंतर ৶१४; बाळकडू:-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ৶८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ৶१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही
ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १৶१० } **द्राक्षासव** { अर्धा रत्तल ৶१४
दीड रत्तल २৶४ } { ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "हुण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स**

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं० २.



हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून
रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.